मुबंई, रायगड, पुणे, संभाजी नगर, जालना, नांदेड, अमरावती, नागपूर, यवतमाळ, बीड, लातूर,नाशिक, जळगाव,चंद्रपूर, येथून एकाच वेळी प्रसिद्ध होणारे एकमेव दैनिक

www.yuvakadhar.in E mail - dainikyuvakaadhar@gmail.com facebook : yuvakadhar

तरुणांचा बुलंद आवाज

दैनिक युवक आधार मराठी

■ मुख्य संपादक - सौ भारती संतोष आमले ■ संपादक - संतोष शिवदास आमले

● उपसंपादक - श्री विलास गायकवाड ● कार्यकारी संपादक - श्री जगन्नाथ रासवे ● निवासी संपादक - श्री राकेश पाटील ● सह संपादक - श्री मुकुंद कांबळे ● महाराष्ट्र संपादक - श्री अजय कापरे ● कायदेशीर सल्लागार - ॲड. सौ प्रियंका विजय मुंढे

■ वर्ष : ३ ■ अंक : २३७ ■ रविवार, १० मे २०२६ ■ किंमत : २ रु ■ पृष्ठ : ८ RNI MAHMAR/2023/89514




# रयत शिक्षण संस्थेला ३.६२ कोटींची देणगी

## लोकनेते रामशेठ ठाकूर, सौ. शकुंतला ठाकूर, परेश ठाकूर यांचा कर्मवीर भूमीत हृद्य गौरव

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (प्रतिनिधी ) :** रयत शिक्षण संस्थेच्या प्रगतीसाठी स्वतःच्या दातृत्वाने शंभर कोटींहून अधिक रुपयांची आर्थिक मदत करणारे, रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य माजी खासदार, थोर देणगीदार लोकनेते रामशेठ ठाकूर व त्यांच्या सुविद्य पत्नी शकुंतला ठाकूर तसेच ठाकूर इंफ्राप्रोजेक्ट लिमिटेडने यंदाही रयत शिक्षण संस्थेच्या विकासासाठी ०३ कोटी ६२ लाख रुपयांची देणगी दिली असून त्याबद्दल त्यांचा रयत शिक्षण संस्थेच्या वतीने संस्थेचे अध्यक्ष खासदार शरद पवार यांच्या हस्ते आज (दि. ९ मे ) सातारा येथे कर्मवीर भूमीत जाहीर हृद्य सत्कार करण्यात आला.













रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक पद्मभूषण कर्मवीर भाऊराव पाटील अर्थात कर्मवीर अण्णा यांचा ६७ वी पुण्यतिथी कार्यक्रम सातारा येथे समाधी परिसरात संपन्न झाला. यावेळी कर्मवीर अण्णा आणि रयत माऊली यांच्या समाधीला अभिवादन करून हा समारंभ पार पडला. यावेळी लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृतमहोत्सवी वाढदिवसानिमित्त रयत शिक्षण संस्थेच्या वतीने संस्थेचे अध्यक्ष शरद पवार यांच्या हस्ते विशेष सत्कार व अभिष्टचिंतन करण्यात आले. यावेळी व्यासपीठावरील उपस्थित मान्यवरांनीही लोकनेते रामशेठ ठाकूर यांना दीर्घायुष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

आपल्याकडील पैशांचा दातृत्वाने सदुपयोग कसा करायचा याचा आदर्श लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी सगळ्यांसमोर ठेवला आहे. रयत शिक्षण संस्थेचे ते माजी विद्यार्थी. 'कमवा आणि शिका' योजनेत त्यांचा सहभाग राहिला आहे. त्यांनी शिक्षक म्हणूनही संस्थेत सेवा केली. लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे वैशिष्ट्य म्हणजे त्यांनी शहरांसोबतच आदिवासी व ग्रामीण भागातील रयत शिक्षण संस्थेच्या शाखांना वेळोवेळी गरजेनुसार उदार हस्ते मदत केली. संस्थेच्या गरजांवर तातडीने प्रतिसाद देण्याचे त्यांचे कार्य सतत सुरू असते. कर्मवीर अण्णांनी तळागाळात शिक्षणाची गंगा निर्माण केली. त्यांचे कार्य निरंतर सुरू राहिले पाहिजे यासाठी लोकनेते रामशेठ ठाकूर अग्रेसर राहिले आहेत आणि तो वारसा ते चालवत आहेत. स्वतःची "जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्था" असूनही, त्यांनी रयत संस्थेला मातृसंस्था मानून रयत शिक्षण संस्थेच्या मदतीला स्वतःला झोकून देत रयतला खंबीर साथ दिली आहे. संस्थेने सांगायचे आणि लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी ताबडतोब अमंलबजावणी करायची हे समिकरण चालत आले आहे. "मळलेल्या वाटेने कोणीही जातो, पण न मळलेल्या वाटेने जाणारेच इतिहास घडवतात", अत्यंत दुर्गम भागात शिक्षणाची पंढरी उभी करत शिक्षणाची उंची निर्माण केली आहे. त्यांच्या दानातून अनेक शाखा उभारल्या आणि त्यामुळे हजारोंच्या नाही तर लाखोच्या संख्येत विद्यार्थ्यांना शिक्षण घेता येत आहे. कर्मवीर अण्णांनी बहुजन समाजाचा विचार करत रयत शिक्षण संस्थेची स्थापना केली. आज संस्थेच्या साडेसातशेहून अधिक शाखांमधून लाखो विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. त्या अनुषंगाने रयत शिक्षण संस्थेच्या आणि पर्यायाने तळागाळातील विद्यार्थ्यांच्या विकासासाठी कर्मवीर अण्णांचे कार्य पुढे घेऊन जाणारे लोकनेते रामशेठ ठाकूर आणि त्यांच्या कुटुंबाचे योगदान कायम अनमोल राहिले आहे. त्या अनुषंगाने रयत शिक्षण संस्थेच्या शैक्षणिक आणि भौतिक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी तसेच विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता वाढीसाठी देणगी रूपाने विशेष योगदान देणारे लोकनेते रामशेठ ठाकूर आणि त्यांच्या सुविद्य पत्नी सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर तसेच ठाकूर इंफ्राप्रोजेक्टच्यावतीने सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर सीबीएससी स्कूलचे चेअरमन व पनवेल महापालिकेचे नगरसेवक परेश ठाकूर यांना हजारो रयत सेवकांच्या उपस्थितीत समारंभपूर्वक सन्मानित करण्यात आले. संस्थेचे अध्यक्ष खासदार शरद पवार यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या समारंभाला प्रमुख पाहुणे म्हणून संस्थेचे चेअरमन चंद्रकांत दळवी, संघटक डॉ. अनिल पाटील, व्हॉईस चेअरमन भगीरथ शिंदे, सचिव विकास देशमुख, उपाध्यक्ष महेंद्र लाड, आमदार दिलीप वळसे पाटील, खासदार सुप्रिया सुळे, खासदार धैर्यशील पाटील, आमदार प्रशांत ठाकूर, आमदार बाळासाहेब पाटील, आमदार आशुतोष काळे, आमदार रोहित पवार, आमदार चेतन तुपे, जे.के. जाधव, माईसरोज पाटील, मीनाताई जगदाळे यांच्यासह अनेक मान्यवरांची उपस्थिती होती.

या कार्यक्रमाच्या निमिताने राज्याचे माजी उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या निधनाबद्दल शोक व्यक्त करून त्यांना संस्थेच्यावतीने श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. यावेळी संस्थेच्या विविध शाखांमध्ये गुणात्मक आणि संख्यात्मक विकास करून समाजाच्या विकासामध्ये अत्यंत महत्त्वपूर्ण योगदान देणा-या संस्थेच्या विविध शाखांना 'कर्मवीर पारितोषिक' देऊन सन्मानित करण्यात आले. त्याचबरोबर माध्यमिक आणि महाविद्यालय स्तरावर शैक्षणिक, सामाजिक, संशोधनात्मक क्षेत्रात अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या प्राध्यापक व शिक्षकांचा सन्मान करण्यात आला. याशिवाय क्रीडा क्षेत्रात अत्यंत उल्लेखनीय कामगिरी करून रयत शिक्षण संस्थेचा लौकिक वाढविणाऱ्या विद्यार्थ्यांचाही सन्मान करण्यात आला. संस्थेचे चेअरमन चंद्रकांत दळवी यांनी संस्थेच्या वाटचालीचा आढावा आपल्या मनोगतातून मांडला. तर कार्यक्रमाचे प्रास्ताविक संस्थेचे सचिव विकास देशमुख यांनी केले.

# मराठीच्या राज्यातच मराठी नापास!
# SSC मध्ये 94 हजारांहून अधिक विद्यार्थी

**दैनिक युवक आधार छत्रपती संभाजीनगर**

**योगेश पालोदकर जिल्हा प्रतिनिधी प्रमुख :** महाराष्ट्र राज्य मंडळाच्या (SSC) दहावी निकालात तब्बल 94,464 विद्यार्थ्यांना मराठी विषयात अपयश आले आहे. ही आकडेवारी केवळ चिंताजनक नसून राज्यातील शिक्षण व्यवस्थेच्या कार्यक्षमतेवर थेट प्रश्नचिन्ह निर्माण करणारी आहे.मराठी ही महाराष्ट्राची मातृभाषा असून नुकताच तिला अभिजात भाषेचा दर्जा प्राप्त झाला आहे. अशा वेळी राज्य मंडळाच्या परीक्षेतच मराठी विषयात एवढ्या मोठ्या प्रमाणात विद्यार्थी नापास होणे, हे प्रशासनाचे आणि धोरणात्मक अंमलबजावणीचे स्पष्ट अपयश दर्शवते.जर ही परिस्थिती CBSE किंवा इतर केंद्रीय बोर्डात दिसली असती तर ती वेगळी बाब मानली जाऊ शकली असती; मात्र राज्याच्या स्वतःच्या बोर्डामध्ये ही अवस्था निर्माण होणे अधिक गंभीर आहे.

**मुख्य मुद्दे:**

शाळांमध्ये मराठी अध्यापनाची गुणवत्ता वाढवण्याची तातडीची गरज.

अभ्यासक्रम व मूल्यमापन पद्धतीचा सखोल आढावा आवश्यक.

शिक्षक प्रशिक्षण आणि विशेष सुधारणा कार्यक्रम राबवावेत.

राज्य शासनाने केंद्राकडून अभिजात भाषेच्या दर्जानुसार निधी व विशेष योजना प्रभावीपणे मिळवाव्यात.

राज्यात शिक्षण घेणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांना — स्थानिक तसेच परप्रांतीय — मराठीचे मूलभूत ज्ञान सक्तीने आणि प्रभावीपणे दिले जावे.

मराठी ही केवळ भाषा नसून महाराष्ट्राची ओळख आहे. त्यामुळे या विषयातील घसरण ही केवळ शैक्षणिक समस्या नसून सांस्कृतिक जबाबदारीशी संबंधित गंभीर प्रश्न आहे.

राज्य शासन, शिक्षण विभाग आणि सर्व राजकीय पक्षांनी या मुद्द्यावर राजकीय नव्हे तर धोरणात्मक आणि परिणामकारक उपाययोजना करणे ही काळाची गरज आहे.

# खारघर डंपर अपघातप्रकरणी संबंधित कंपनीवरही कारवाईची मागणी

**विधानपरिषद आमदार विक्रांत पाटील यांची खारघर पोलीस ठाण्यात एसीपी विकास कदम यांच्याशी चर्चा**





**दैनिक युवक आधार**

**प्रातिनिधि वार्ताहर :** खारघरमध्ये काही दिवसांपूर्वी झालेल्या भीषण डंपर अपघातात ॲड महेश लोहार यांचा जागीच मृत्यू झाल्याच्या घटनेनंतर परिसरात संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे. या पार्श्वभूमीवर विधानपरिषद आमदार विक्रांत पाटील यांनी आज खारघर पोलीस स्टेशनमध्ये एसीपी विकास कदम यांची भेट घेत संपूर्ण घटनेची माहिती घेतली. यावेळी त्यांनी अपघातातील दोषींवर कठोर कारवाई करण्यासोबतच संबंधित डंपर ज्या कंपनीच्या कामासाठी वापरला जात होता त्या गोदरेज ग्रुप कंपनीवरही जबाबदारी निश्चित करून कारवाई करण्यात यावी, अशी मागणी केली.

या घटनेनंतर नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत असून शहरातील अवजड वाहनांच्या वाढत्या बेफाम वाहतुकीचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. माध्यमांशी बोलताना आमदार विक्रांत पाटील यांनी निष्पाप नागरिकांचा जीव जाणे अत्यंत दुर्दैवी असल्याचे सांगितले. केवळ चालकावर कारवाई करून चालणार नाही, तर संबंधित डंपर कोणाच्या कामासाठी वापरला जात होता, सुरक्षा नियमांचे पालन झाले होते का, तसेच संबंधित कंपनीची जबाबदारी काय होती याचीही सखोल चौकशी झाली पाहिजे, असे त्यांनी स्पष्ट केले.

अपघातग्रस्त कुटुंबाला न्याय मिळाला पाहिजे तसेच संपूर्ण प्रकरणाची फास्ट ट्रॅक पद्धतीने चौकशी व्हावी, अशी मागणीही त्यांनी केली. शहरातील अवजड वाहनांवर नियंत्रण ठेवण्यासाठी प्रशासनाने कठोर उपाययोजना करणे गरजेचे असल्याचे त्यांनी नमूद केले. विशेषतः गर्दीच्या भागात डंपर आणि जड वाहनांच्या वाहतुकीवर वेळेचे निर्बंध घालणे, नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कठोर दंडात्मक कारवाई करणे आणि वाहतूक व्यवस्थेवर विशेष लक्ष देणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी पोलिस प्रशासनाने या प्रकरणाचा तपास सुरू असल्याची माहिती दिली. घटनेतील सर्व बाबींची चौकशी करून दोषींवर नियमानुसार कारवाई करण्यात येईल, असे आश्वासन अधिकाऱ्यांकडून देण्यात आल्याचे विक्रांत पाटील यांनी सांगितले.

दरम्यान, ॲड महेश लोहार यांच्या मृत्यूमुळे खारघर परिसरात हळहळ व्यक्त होत असून विविध सामाजिक आणि राजकीय स्तरातून कुटुंबीयांना न्याय देण्याची मागणी जोर धरू लागली आहे. शहरातील अवजड वाहनांच्या वाढत्या धोक्याबाबत प्रशासनाने तातडीने ठोस पावले उचलावीत, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.




**पाटोदा : अमंळनेर येथे श्री.रानेश गिते पाटील यांचा मुलगा व पाटोदा नगर पंचायतचे माजी सभापती तथा विद्यमान नगरसेवक श्रीहरी गिते पाटील यांचे पुतणे चि.प्रविण गिते व श्री.प्रल्हाद बडे पाटील(मानेवाडी, चिंचपूर ता.पाथर्डी) यांची मुलगी चि.सौ.का.सविता यांच्या शुभ विवाह प्रसंगी उपस्थित राहुन आष्टी / पाटोदा / शिरूर विधानसभा मतदारसंघाचे युवा नेते जयदत्त भैय्या धस यांनी शुभेच्छा दिल्या या वेळी त्यांच्या सत्कार करताना. नगरसेवक श्रीहरी गिते पाटील, आमदार सुरेश आण्णा धस यांचे स्विय सहाय्यक तथा पाटोदा तालुका पत्रकार संघाचे अध्यक्ष सोमिनाथ कोल्हे, दत्तात्रय गिते पाटील, माजी मुख्याध्यापक एल.आर. जाधव सर, पत्रकार सतिष गर्जे सह इतर**

**(छाया - दैनिक युवक आधार पाटोदा.)**

# खरीप हंगामात कृषी विभागाने शेतकऱ्यांना खते व बियाणांचा पुरवठा सुरळीत करावा : भरत गोगावले

**दैनिक युवक आधार**
**महाराष्ट्र प्रतिनिधी :** आगामी खरीप हंगाम लक्षात घेता बियाणे, खते, कीटकनाशके आदी निविष्ठा सर्वत्र उपलब्ध असण्याच्या दृष्टीने परिपूर्ण नियोजन करा तसेच कोणत्याही परिस्थितीत खते, बियाणे यांची टंचाई भासणार नाही याबाबतची दक्षता घ्यावी, असे निर्देश रोजगार हमी योजना, फलोत्पादन, खारभूमी विकास मंत्री भरत गोगावले यांनी दिले.ते जिल्हा नियोजन भवन सभागृहात अलिबाग यथे आयोजित खरीप हंगाम आढावा बैठकी वेळी बोलत होते. या बैठकीला आमदार महेंद्र दळवी, जिल्हा परिषद अध्यक्ष मंगेश वाकडीकर, सभापती वैकुंठ पाटील, जिल्हाधिकारी किशन जावळे, मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, अतिरिक्त मुख्य कार्यकारी डॉ.रुपाली सातपुते, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी वंदना शिंदे आदी उपस्थित होते.



पुढे मार्गदर्शन करताना रोजगार हमी योजना, फलोत्पादन, खारभूमी विकास मंत्री भरत गोगावले म्हणाले की, खरीप हंगामामध्ये बियाणे आणि खतांचा प्रश्न मोठ्या प्रमाणावर जाणवतो. त्यामुळे या दोन्हीचे नियोजन आवश्यक आहे. पिक पेरणी क्षेत्राला आवश्यक असणाऱ्या बियाण्यांची उपलब्धता होण्यासाठी कृषी विभागाचे नियोजन महत्त्वाचे ठरणार आहे. गुणनियंत्रण विभागाने दक्ष राहून बोगस बियाणे, खतांची विक्री होणार नाही याबाबतची दक्षता घ्यावी अशा सूचना मंत्री भरत गोगावले यांनी दिल्या. रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यांच्याप्रमाणे रायगड जिल्ह्यातील आंबा बागायतदारांचे पंचनामे पूर्ण करण्याची कार्यवाही तातडीने करावी.

शेतकरी हवालदिल झाला असून त्यांना दिलासा देण्यासाठी योग्य त्या उपाययोजना कराव्यात. कोकणातील शेतकरी हा छोटा असून त्यांना ज्या लागणाऱ्या सोयी-सुविधा देणे आपली जबाबदारी आहे असेही त्यांनी यावेळी सांगितले. जिल्ह्यात भात व नाचणी पिकांच्या वाढीसाठी शेतकऱ्यांना प्रोत्साहित करावे. पुढच्या भावी पिढीसाठी काही करायच असेल तर आपल्याला मेहनत करणे ही काळाची गरजअसल्याचे सांगून वन्यप्राण्यांपासून शेतीचे संरक्षण करण्याकरिता जिल्हा परिषद सेसमधून अनुदान दिले जाते. या अनुदानाचे योग्य ते नियोजन करुन शेतकऱ्यांच्या शेतीचे वन्यप्राण्यांपासून होणार नुकसान कसे टाळता येईल ते पहावे. वन्यप्राण्यांपासून संरक्षण करण्याकरिता अधिकारी वर्गाला प्रशिक्षण देण्यात यावे. या प्रशिक्षित अधिकाऱ्यांकडून शेतकऱ्यांना योग्य ते मार्गदर्शन करावे अशा सूचना त्यांनी यावेळी उपस्थित अधिकाऱ्यांना दिल्या.

ते म्हणाले हे शासन बळीराजाचे असून शेतकऱ्यांना आवश्यक असणाऱ्या सोयी-सुविधा शासनाकडून पुरविण्यात येतात. प्रत्येक अधिकाऱ्यांनी मनापासून काम केल्यास आपण शेतकऱ्यांना सक्षम बनवू शकतो. खरीप पीक हंगामासाठी शेतकऱ्यांना कर्जपुरवठा सुरळीत झाला पाहिजे. एकही शेतकरी पीक कर्जापासून वंचित राहणार नाही याबाबत दक्षता घ्यावी. पीक कर्जाचे देण्यात आलेले उद्दिष्ट पूर्ण करा. शेतकऱ्यांना पिक विम्याची समस्या जाणवते. पिक विमा योजनेचा शेतकऱ्यांना फायदा होण्यासाठी प्रशासकीय यंत्रणेने लक्ष देण्याची गरज आहे. यावेळी शेतकऱ्यांना नवीन नवीन पिके घेण्यासाठी प्रोत्साहन देण्यात यावे. हळदी पीक घेण्यात यावे व हळदीचे क्षेत्र वाढविण्यासाठी सामूहिक प्रयत्न करावेत अशा सूचनाही मंत्री श्री. गोगावेले यांनी दिल्या. बैठकीच्या सुरूवातीला जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी वंदना शिंदे यांनी खरीप हंगामपूर्व तयारी व नियोजनाचा आढावा संगणकीय सादरीकरणाद्वारे सादर केला. यावेळी जिल्ह्यातील नाविन्यपूर्ण उपक्रम राबविलेल्या शेतकऱ्यांना बियांण्याचे तसेच उत्कृष्ट काम केलेल्या कृषी अधिकाऱ्यांचा मान्यवरांचा हस्ते प्रमाणपत्र देवून सत्कार करण्यात आला. तसेच शेतकऱ्यांसाठी उपयुक्त ठरणाऱ्या माहितीपुस्तिकांचे मान्यवरांच्या हस्ते विमोचनही करण्यात आले. बैठकीस सर्व संबंधित विभागांचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते.

## महेंद्रशेठ घरत यांचे कर्मवीर भाऊराव पाटील यांना अभिवादन!

**दैनिक युवक आधार**
**उलवे, वार्ताहर :** आंतरराष्ट्रीय कामगार नेते आणि काँग्रेसचे रायगड जिल्हाध्यक्ष महेंद्रशेठ घरत यांनी सातारा येथे कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या समाधीचे दर्शन घेऊन त्यांना अभिवादन केले. रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक अध्यक्ष कर्मवीर भाऊराव पाटील यांची ६७ पुण्यतिथी शनिवारी (ता.९) सातारा येथील रयत शिक्षण संस्थेच्या मुख्यालयात साजरी करण्यात आली. यावेळी राज्यातील मान्यवर मंडळी उपस्थित होती.



यावेळी महेंद्रशेठ घरत म्हणाले, "रयत शिक्षण संस्थेमुळे कोट्यवधी गरिबातल्या गरिबांची मुले शिकली आहेत. त्यातलाच मी एक रयतचा विद्यार्थी आहे. रयत शिक्षण संस्थेत शिकल्यामुळेच मी आज जगाच्या व्यासपीठावर लीलया वावरतो. आयएलओ आणि आयटीएफ या जागतिक कामगार संघटनांचे नेतृत्व करतो. आपल्या ताटातील अर्धी भाकरी भुकेलेल्याला द्या, ही कर्मवीर भाऊराव पाटील यांची शिकवण मी प्रत्यक्षात जगतो. त्यामुळे शाळांना कोट्यवधींची देणगी आजपर्यंत दिली आहे. रयत शिक्षण संस्थेच्या दुर्गम भागातील शाळांनाही सढळ हस्ते मदत करतो. आज मी रयत शिक्षण संस्थेच्या जनरल बॉडी सदस्यपदी आहे, याचा मला सार्थ अभिमान आहे. कर्मवीर भाऊराव पाटील यांचे आपणा सर्वांवर अनंत उपकार आहेत, त्यांचे उपकार भेडू शकत नाही, पण त्यांना अभिवादन करणे माझे कर्तव्य आहे. त्यामुळे गेली अनेक वर्षे सातारा येथे येऊन कर्मवीरांना अभिवादन करतो."

## फुलचोर येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त भव्य मोफत आरोग्य शिबिर संपन्न

**दैनिक युवक आधार**
**सचिन बन्सोड गोंदिया जिल्हा प्रतिनिधी :** भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, परमपूज्य विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीचे औचित्य साधून फुलचोर येथे भव्य 'निशुल्क आरोग्य तपासणी शिबिराचे' आयोजन करण्यात आले होते. डॉ. आशाताई मेश्राम यांच्या वतीने आयोजित या शिबिराला परिसरातील नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.




डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांतून प्रेरणा घेऊन आणि "आरोग्य संपन्न समाज" घडवण्याच्या ध्येयाने डॉ. आशाताई मेश्राम यांनी या सामाजिक उपक्रमाचे आयोजन केले होते.

मान्यवरांची उपस्थिती

या शिबिराचे उद्घाटन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले . शिबिराला प्रमुख उपस्थिती म्हणून सुनिता सव्वालाखे मॅडम लाभल्या होत्या. त्यांनी उपस्थितांना मार्गदर्शन करताना डॉ. आशाताई मेश्राम यांच्या सामाजिक कार्याचे आणि आरोग्य सेवा क्षेत्रातील योगदानाचे विशेष कौतुक केले.

**शिबिराची वैशिष्ट्ये:**

तज्ज्ञ डॉक्टरांकडून सेवा: विविध व्याधींवर तज्ज्ञ डॉक्टरांच्या पथकाने रुग्णांची मोफत तपासणी केली.

मोफत औषधोपचार: शिबिरात आलेल्या गरजू रुग्णांना तातडीने मोफत औषध वाटप करण्यात आले.

आरोग्य जनजागृती: ग्रामीण भागातील जनतेला आरोग्याप्रती जागरूक करण्यासाठी या शिबिराचा मोठा फायदा झाला.

या शिबिराच्या यशस्वीतेसाठी डॉ. आशाताई मेश्राम आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

जयंतीचे औचित्य साधून राबवलेल्या या विधायक उपक्रमाचे फुलचोर परिसरात सर्वत्र स्वागत होत आहे.

## मुरूडेश्वर माध्यमिक विद्यालयाचा दहावी निकाल ८५.७१ टक्के; विद्यार्थ्यांचे घवघवीत यश

### प्रणिता साकळे प्रथम, श्रुती गोदाडे द्वितीय तर शिवानी चव्हाण तृतीय

**दैनिक युवक आधार**
**मुरुड | प्रतिनिधी :** मुरुड येथील मुरूडेश्वर माध्यमिक विद्यालयाने महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, विभागीय मंडळ लातूर यांच्या वतीने घेण्यात आलेल्या मार्च २०२६ च्या एसएससी बोर्ड परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. विद्यालयाचा एकूण निकाल ८५.७१ टक्के लागला असून विद्यार्थ्यांनी उज्वल यश मिळवत विद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे.



विद्यालयातील गुणवंत विद्यार्थ्यांमध्ये कु. प्रणिता कुमार साकळे हिने ८४.४० टक्के गुण मिळवत प्रथम क्रमांक पटकावला. कु. श्रुती विजय गोदाडे हिने ७८.२० टक्के गुणांसह द्वितीय क्रमांक मिळविला, तर कु. शिवानी अंकुश चव्हाण हिने ७४.२० टक्के गुण मिळवत तृतीय क्रमांक प्राप्त केला.

यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेच्या व विद्यालयाच्या वतीने अभिनंदन करण्यात आले. तसेच गुणवंत विद्यार्थी व त्यांच्या पालकांचा सत्कार समारंभही आयोजित करण्यात आला.

यावेळी संस्थेचे अध्यक्ष श्री. संजय प्रकाशराव नाडे, सचिव मा. श्री. बाळासाहेब निवृत्ती डोंगरे, ज्येष्ठ नागरिक इंजिनिअर चौधरीसाहेब, विद्यालयाचे मुख्याध्यापक, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते. तसेच पालक श्री. अंकुश चव्हाण, श्री. विजय गोदाडे, श्रीमती साकळे यांच्यासह विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.विद्यालयाच्या यशाबद्दल परिसरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.


## अकोलेकरांसाठी खगोलीय पर्वणी!

### पहाटेच्या आकाशात चमकणार 'इंटरनॅशनल स्पेस स्टेशन'

**दैनिक युवक आधार**
**दिलीप कराळे/प्रतिनिधी अकोला:** खगोलप्रेमी आणि विद्यार्थ्यांसाठी एक आनंदाची बातमी आहे ! अवकाशात तरंगणारी मानवनिर्मित प्रयोगशाळा म्हणजेच 'इंटरनॅशनल स्पेस स्टेशन' (ISS) आता अकोल्याच्या आकाशात थेट साध्या डोळ्यांनी पाहता येणार आहे. येत्या १० आणि ११ मे रोजी ही मोठी खगोलीय घटना अनुभवण्याची संधी अकोलेकरांना मिळणार आहे.

हे स्पेस स्टेशन आकाशात एखाद्या तेजस्वी ताऱ्यासारखे, पण वेगाने सरकताना दिसेल. विशेष म्हणजे, यासाठी कोणत्याही दुर्बिणीची गरज भासणार नाही.

स्पेस स्टेशन आपल्याला



१० मे पहाटे ४:४१ ते ४:४८ पर्यंत वायव्य (North-West) ते आग्नेय (South-East) आणि

११ मे पहाटे ३:४४ ते ४:०० पर्यंत वायव्य दिशेला बघता येईल.

हे स्पेस स्टेशन एखाद्या अतिशय तेजस्वी पांढऱ्या ठिपक्यासारखे दिसेल.

ते ताऱ्यासारखे लुकलुकणार नाही, तर एका संथ वेगाने जाणाऱ्या विमानाप्रमाणे सरळ रेषेत पुढे जाईल.

विमानापेक्षा याचा वेग जास्त असतो आणि याला कोणत्याही लाल-निळ्या दिव्यांच्या लाइट नसतात.विज्ञानाचा अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी ही एक उत्तम संधी आहे.

पृथ्वीपासून सुमारे ४०० किमी उंचीवर राहून ताशी २८,००० किमी वेगाने फिरणारे हे स्टेशन पाहणे हा एक रोमांचक अनुभव ठरणार आहे.

अकोल्यातील खगोलप्रेमींनी या संधीचा लाभ घ्यावा आणि पहाटेच्या शांत आकाशातील या 'मानवी चमत्काराचे' साक्षीदार व्हावे, असे आवाहन करण्यात येत आहे.

## समाज जागृती विद्यालयाचा एसएससी परीक्षेत ७८.६८ टक्के निकाल; विद्यार्थ्यांचे उज्ज्वल यश

### आरती पांचाळ प्रथम, अक्षरा माने द्वितीय तर कृष्णा सापसोड तृतीय

**दैनिक युवक आधार**
**मुरुड | प्रतिनिधी :** समाज जागृती शिक्षण संस्था, मुरुड संचलित समाज जागृती माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाने फेब्रुवारी/मार्च २०२६ मध्ये घेण्यात आलेल्या एसएससी बोर्ड परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. विद्यालयाने यंदा ७८.६८ टक्के निकाल नोंदवत उज्ज्वल परंपरा कायम राखली आहे.

विद्यालयातून एकूण ८० विद्यार्थी परीक्षेला प्रविष्ट झाले होते. त्यापैकी ३२ विद्यार्थी प्रथम श्रेणीत, तर ३१ विद्यार्थी द्वितीय श्रेणीत उत्तीर्ण झाले आहेत.

**मराठी माध्यमातील गुणवंत विद्यार्थी :**

कु. पांचाळ आरती रामेश्वर — ८८.६० टक्के गुण मिळवून प्रथम क्रमांक पटकाविला.

कु. आवटे प्रकृती प्रदीप — ८१.६० टक्के गुणांसह द्वितीय क्रमांक मिळविला.

कु. भोसले जया नागनाथ — ८०.०० टक्के गुणांसह तृतीय क्रमांक प्राप्त केला.

सेमी माध्यमातील गुणवंत विद्यार्थी :




कु. माने अक्षरा अनंतराव — ८४.०० टक्के गुण मिळवून प्रथम क्रमांक पटकाविला.

कु. सापसोड कृष्णा विलास — ८२.८० टक्के गुणांसह द्वितीय क्रमांक मिळविला.

कु. ढवळे गायत्री महादेव — ८२.६० टक्के गुणांसह तृतीय क्रमांक प्राप्त केला.

या यशाबद्दल सर्व उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष श्री बी.एस. पाटोळे (दादा), सचिव श्री डॉ. बी.वाय. पाटील, संचालक मंडळ तसेच विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री कदम एस. भेंडे यांनी अभिनंदन केले. शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनीही विद्यार्थ्यांच्या यशाबद्दल आनंद व्यक्त केला.

## गुणवत्तेचा वारसा अबाधित! आर. के. एफ. शाळेची दहावीच्या निकालात गगनभरारी !


**दैनिक युवक आधार :** नाव बदलले, संस्था बदलली, काळ बदलला; पण गुणवत्तेचा वारसा मात्र आजही अबाधित आहे! कामगार वसाहतीतील नावाजलेली शाळा म्हणून ओळख असलेल्या आर. के. एफ. (RKF) हायस्कूलने (पूर्वीची आय. ई. एस. शाळा) मार्च २०२६ च्या एसएससी (दहावी) बोर्ड परीक्षेत आपल्या ऐतिहासिक नावलौकिकाला साजेसे देदीप्यमान यश संपादन केले आहे. शिस्त, संस्कार आणि उत्तम निकालाची पिढ्यानपिढ्या चालत आलेली परंपरा यावर्षीही शाळेच्या विद्यार्थ्यांनी मोठ्या दिमाखात कायम राखली आहे.

इंग्रजी माध्यमाचा निकाल ९९.५०% लागला असून, परीक्षेस बसलेल्या २०० विद्यार्थ्यांपैकी १९९ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. गुणवंत विद्यार्थ्यांची यादी खालीलप्रमाणे:

१. मैत्रेयी प्रवीण घरत - ९६.४०% (प्रथम)
२. बेबो सुदामा रौथान - ९५.६०% (द्वितीय)
३. प्राप्ती अंकुश जोगळे - ९४.६०% (तृतीय)
४. जाई प्रशांत हिंगणे - ९४.४०% (चतुर्थ)
५. रुद्राक्षी मनोहर टेमकर - ९३.८०% (पाचवा)

मराठी माध्यमाची शंभर टक्के भरारी:

मराठी माध्यमाचा निकाल १००% लागला असून सर्व ६४ विद्यार्थी यशस्वी झाले आहेत. गुणवंत विद्यार्थ्यांची यादी खालीलप्रमाणे:




१. संस्कृती बाळू लवटे - ९४.६०% (प्रथम)
२. आर्या नितीन कोळी - ९२.८०% (द्वितीय)
३. आर्या जगदीश गावंड (तृतीय)९१.८० टक्के
४. अवनिश मिलिंद जाधव (चतुर्थ)९१.६०
५. वेदांत दयानंद कासले - ८६.६०% (पाचवा)

शाळेच्या या यशाचे श्रेय संस्थाचालक, इंग्रजी माध्यमाचे मुख्याध्यापक अंकुश जोगळे सर, भूषण जाधव सर आणि मराठी माध्यमाचे मुख्याध्यापक गिरीश पाटील सर यांच्या कुशल मार्गदर्शनाला व सर्व शिक्षकांच्या परिश्रमाला जाते.आणि आर के एफ च्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या यशामध्ये प्रतिबिंबित होत आहे सध्या सर्व स्तरातून यशस्वी विद्यार्थ्यांचे मुख्याध्यापकांचे आणि शिक्षक वृंदांचे कौतुक होत असून त्यांच्यावर अभिनंदन याचा वर्षाव केला जात आहे विद्यार्थ्यांच्या पुढील उज्वल भविष्यासाठी अनेक मान्यवरांनी शुभेच्छा दिल्या आहेत.

## र . ना . राऊत विद्यालयाचा दैदिप्यमान निकाल ; ९२ .९० टक्के विद्यार्थी उत्तीर्ण

**दैनिक युवक आधार**
**श्रीवर्धन तालुका प्रतिनिधी अनिकेत मोहित :** रवींद्र नारायण राऊत माध्यमिक विद्यालय यांनी मार्च २०२६ मध्ये झालेल्या माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (SSC) परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करत ९२.९० टक्के निकालाची चमकदार नोंद केली आहे.

विद्यालयाच्या या उज्ज्वल यशामुळे संपूर्ण श्रीवर्धन तालुक्यात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

यंदाच्या परीक्षेसाठी विद्यालयातील एकूण १४१ विद्यार्थी बसले होते. त्यापैकी तब्बल १३१ विद्यार्थी यशस्वीरीत्या उत्तीर्ण झाले असून विद्यालयाने आपल्या शैक्षणिक गुणवत्तेची परंपरा कायम राखली आहे.

विद्यालयातील गुणवंत विद्यार्थ्यांनीही उल्लेखनीय यश मिळवत विद्यालयाचे नाव उंचावले.प्रथम क्रमांक अमृता अमोल कचरेकर हिने ९६.६० टक्के गुण मिळवत पटकावला. तर सुशांत सुभाष राजे याने ९४.०० टक्के गुणांसह द्वितीय क्रमांक मिळवला. देवेंद्र मोहन वैद्य (९०.४०%), श्रेया रवींद्र चौलकर (९०.२०%) आणि विशाखा राहुल धर्माधिकारी (८९.००%) यांनी अनुक्रमे पुढील क्रमांक पटकावत उल्लेखनीय कामगिरी केली.

या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष अनिल भुसाणे, स्थानिक शाळा समितीचे सभापती जितेंद्र सातनाक तसेच विद्यालयाचे मुख्याध्यापक संदीप भगत यांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे, शिक्षकांचे व पालकांचे अभिनंदन करत विद्यार्थ्यांच्या पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# नेहरू इंग्लिश स्कूलची 52 वर्षाची उज्वल यशाची परंपरा कायम..!

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी / अरविंद पांचाळ** : राजस्थानी एज्युकेशन सोसायटीच्या अंतर्गत असलेल्या नेहरू इंग्लिश स्कूल, सोमेश कॉलनी, नांदेड येथील इंग्रजी माध्यमाच्या शाळेने दरवर्षीप्रमाणे या वर्षीही उत्कृष्ट निकालाची परंपरा कायम ठेवली आहे. शालांत प्रमाणपत्र परीक्षा मार्च २०२६ परीक्षेसाठी बसलेल्या ९८ विद्यार्थ्यांपैकी ९० टक्के पेक्षा जास्त गुण घेणारे विद्यार्थी: प्रथम क्रमांक कु. भालेराव प्रिया भगवान या विद्यार्थिनीने ९६.४० टक्के घेऊन शाळेतून सर्वप्रथम आली आहे. तर द्वितीय क्रमांक अहमेदी मुनइझा मिर्झा मुस्ताक वसीम बेग विद्यार्थिनीने ९५.८० टक्के घेऊन द्वितीय क्रमांक पटकावला. तृतीय क्रमांक जहागीरदार सोनाक्षी ९५.१० व चतुर्थ क्रमांक

### दहावीचा निकाल 95 टक्के...

निधी पवार ९१.२०. येथे यश संपादन केले आहे.

विशेष प्राविण्यवंत उत्तीर्ण विद्यार्थी ३०, प्रथम श्रेणीत ३५ विद्यार्थी, द्वितीय श्रेणीत २१ विद्यार्थी व इतर उत्तीर्ण ०७ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. शाळेचा एकूण निकाल ९४.८९ टक्के लागला आहे. शाळेच्या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष ओमप्रकाश गिल्डा, सचिव प्रकाश मालपाणी, संस्थेचे जयप्रकाश काबरा, कमलकिशोर कोठारी, कुणालजी मालपाणी, अमित जी अग्रवाल व राजस्थानी एज्युकेशन सोसायटीचे सर्व सदस्य व शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर स्टाफ यांनी गुणवंत विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे.

# आष्टी तालुक्यातील दहावीच्या परीक्षेत पाच विद्यार्थ्यांची उत्तुंग भरारी

## कु.अक्षता अनिल नन्नवरे राज्यात प्रथम

**दैनिक युवक आधार**

**बीड आष्टी प्रतिनिधी मारुती सत्रे** : दहावीच्या निकालात आष्टी तालुक्याने घवघवीत यश संपादन केले आहे. विशेष म्हणजे, तालुक्यातील पाच विद्यार्थिनींनी १०० टक्के गुण (बेस्ट ऑफ फाइव्ह) मिळवून जिल्ह्याच्या शैक्षणिक क्षेत्रात तालुक्याचा दबदबा निर्माण केला आहे. या उत्तुंग यशामध्ये आष्टी येथील वसुंधरा विद्यालयाच्या चार विद्यार्थिनींनी बाजी मारली आहे.यामध्ये अक्षता अनिल नन्नवरे,सिद्धी संदीप पवार,सिद्धी संजू कर्डिले आणि अक्षरा अशोक पवार या चौघींचा समावेश आहे. एकाच शाळेतील चार मुलींनी



१०० टक्के गुण मिळवल्याने वसुंधरा विद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे.

तसेच आष्टी येथील जिल्हा परिषद कन्या प्रशालेची विद्यार्थिनी सायली बबन उकले हिने देखील १०० टक्के गुण प्राप्त करत आपल्या शाळेचा आणि कुटुंबाचा नावलौकिक वाढवलाआहे. या पाचही रणरागिणींच्या यशाने तालुक्यात आनंदाचे वातावरण पसरले आहे. ग्रामीण भागातील मुलींनी जिद्द आणि चिकाटीच्या जोरावर हे यश मिळवल्याने त्यांचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.

# RKSVM शाळेची दैदिप्यमान कामगिरी; विद्यार्थिनी श्रीजा छापरवाल धर्माबाद तालुक्यात प्रथम

## 100% निकालाची गौरवशाली परंपरा कायम, गुणवत्तेचा पुन्हा झेंडा उंचावला

**दैनिक युवक आधार**

**धर्माबाद प्रतिनिधी गिरमाजी सुर्यकार** : महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या लातूर विभागीय मंडळातर्फे घेण्यात आलेल्या इयत्ता दहावी (SSC) परीक्षेचा निकाल दिनांक 8 मे 2026 रोजी जाहीर झाला. या निकालामध्ये धर्माबाद येथील राजाराम काकाणी सहकार विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालय (RKSVM) ने पुन्हा एकदा आपल्या शैक्षणिक गुणवत्तेची चमक दाखवत अभूतपूर्व यश संपादन केले आहे. शाळेने सलग 100 टक्के निकालाची उज्ज्वल, गौरवशाली आणि प्रेरणादायी परंपरा कायम राखत धर्माबाद तालुक्यात मानाचा तुरा रोवला आहे.




शाळेतील अत्यंत हुशार आणि गुणवंत विद्यार्थिनी कु. श्रीजा योगेश छापरवाल हिने तब्बल 98.20 टक्के गुण मिळवत धर्माबाद तालुक्यात प्रथम क्रमांक पटकावून शाळेच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला आहे. तिच्या या नेत्रदीपक यशामुळे संपूर्ण शहरातून तिच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. तसेच कु. ऐश्वर्या भास्कर परसुरे आणि नमन राजू शर्मा यांनी 96.40 टक्के गुण मिळवत द्वितीय क्रमांक प्राप्त करून शाळेच्या यशात भर घातली आहे.

यंदाच्या परीक्षेत शाळेचे सर्व 54 विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून 54 पैकी 54 विद्यार्थी यशस्वी झाल्याने शाळेचा शंभर टक्के निकाल लागला आहे. विद्यार्थ्यांची मेहनत, शिक्षकांचे सातत्यपूर्ण मार्गदर्शन आणि पालकांचे सहकार्य यामुळे हे उल्लेखनीय यश शक्य झाल्याची भावना व्यक्त होत आहे.

विद्यार्थ्यांमध्ये गुणवत्ता व स्पर्धात्मकता निर्माण करण्यासाठी RKSVM शाळेकडून सन 2021 पासून विशेष रोख पारितोषिक योजना राबविण्यात येत आहे. या योजनेंतर्गत
— तालुका प्रथम क्रमांक : ₹11,000/-
तालुका द्वितीय क्रमांक : ₹7,000/-
तालुका तृतीय क्रमांक : ₹5,000/-
अशी आकर्षक रोख बक्षिसे देऊन विद्यार्थ्यांचा गौरव केला जातो. त्यामुळे विद्यार्थ्यांना अधिक मेहनत घेण्याची प्रेरणा मिळत असल्याचे पालक व शिक्षकांकडून सांगितले जात आहे.

RKSVM शाळा ही केवळ गुणवत्तापूर्ण शिक्षण देणारी संस्था नसून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी कटिबद्ध असलेली आदर्श शैक्षणिक संस्था म्हणून ओळख निर्माण करत आहे. नवीन शैक्षणिक धोरणानुसार आधुनिक शिक्षणपद्धती, डिजिटल सुविधा, अत्याधुनिक प्रयोगशाळा, क्रीडा साहित्य, कला-कौशल्य विकास, व्यक्तिमत्त्व विकास उपक्रम आणि विद्यार्थीकेंद्रित शिक्षण यावर विशेष भर दिला जात आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास, नेतृत्वगुण आणि बौद्धिक विकास मोठ्या प्रमाणात घडत असल्याचे समाधान पालकांनी व्यक्त केले आहे.

या उल्लेखनीय यशामागे शाळेचे व्यवस्थापकीय संचालक सुबोधजी काकाणी यांचे दूरदृष्टीपूर्ण नेतृत्व, संचालक मंडळाचे नियोजन, प्राचार्य व उपप्राचार्यांचे मार्गदर्शन तसेच शिक्षकवृंदाची अथक मेहनत कारणीभूत ठरली आहे. विद्यार्थ्यांना वेळोवेळी दिलेले शैक्षणिक मार्गदर्शन, नियमित सराव परीक्षा, वैयक्तिक लक्ष आणि प्रेरणादायी वातावरण यामुळेच शाळेने हे दैदिप्यमान यश संपादन केल्याची चर्चा शहरभर होत आहे.

**यावेळी व्यवस्थापकीय संचालक सुबोधजी काकाणी म्हणाले,**


"पालकांनी आमच्या संस्थेवर दाखवलेला विश्वास आम्ही सार्थ ठरवला आहे. विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी गुणवत्तापूर्ण शिक्षण, आधुनिक सुविधा आणि सर्वोत्तम मार्गदर्शन देण्यास आम्ही भविष्यातही कटिबद्ध राहू."

RKSVM शाळेच्या या अभिमानास्पद यशाबद्दल धर्माबाद शहरासह परिसरातून विद्यार्थ्यांचे, शिक्षकांचे व संस्थेचे सर्वत्र कौतुक होत असून शाळेने पुन्हा एकदा शिक्षण क्षेत्रात आपले वेगळेपण सिद्ध केले आहे.

# वांगणी येथील कु.प्रणय कवठेकर याची दैदिप्यमान कामगिरी एस.एस.सी.परीक्षेत ९३.२० टक्के गुणांसह शाळेत दुसरा

**दैनिक युवक आधार**

**रमेश राऊत, कल्याण ग्रामिण प्रतिनिधी** : वांगणी येथील विद्या विकास एज्युकेशन सोसायटी माध्यमिक शाळा वांगणी या शाळेमधील कुमार प्रणय दशरथ कवठेकर याने एस एस सी च्या परीक्षेत ९३.२० टक्के गुण मिळवत शाळेत दुसरा क्रमांक पटकावून शाळेच्या



यशात मानाचा तुरा रोवला आहे. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतही सातत्यपूर्ण अभ्यास व मेहनत करून प्रणेने हे यश संपादन केले आहे.वडील एक रिक्षा चालक असून सुद्धा ते सतत मुलांच्या शिक्षणासाठी अहोरात्र मेहनत करत असतात निकाल जाहीर होतात प्रणयच्या शाळेत आणि परिवारात आनंदाचे वातावरण निर्माण झाले सर्वच तरातून प्रणयवर कौतुकाचा वर्षाव होताना दिसून येत आहे.

प्रणय सुरुवातीपासूनच अभ्यासात खूप हुशार आणि एकदम शिस्तप्रिय असा मुलगा आहे बुद्धिबळ हा त्याचा आवडता खेळ असून त्यामध्ये सुद्धा त्याने अनेक बक्षीस जिंकल्याचे त्याच्या आई-वडिलांनी सांगितले प्रणयशी आपण संवाद साधला असता प्रणयने आपल्या मामाकडून आपल्याला शिक्षणाची आवड निर्माण झाल्याचे सांगितले प्रणय चे मामा स्वर्गीय कै.संतोष हाशा पाटील हे हाशा रामा पाटील माध्यमिक आणि उच्च माध्यमिक विद्यालय शिळगाव येथील मुख्याध्यापक होते मामाचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून पुढे जाण्याचा निर्धार प्रणय याने व्यक्त केला आहे.

# यशाची परंपरा कायम कै. गोविंदराव पाटील विद्यालयाचा इयत्ता दहावीचा निकाल ८८.५० टक्के

**दैनिक युवक आधार**

**श्रीक्षेत्र माहूरगड:प्रतिनिधी/सय्यद इसा** : कै.गोंविदराव पाटील विद्यालय वझरा शेख फरीद या शाळेच्या विद्यार्थ्यांनी दहावीच्या परीक्षेत निकालात बाजी मारली.

१)कु.नगमा रहिम सय्यद - 83.20%
कुमार अजित राठोड - 83.20%
दोघे प्रथम
२) श्रद्धा शिवाजी फड द्वितीय - 83%
३) माधवी उमेश ठाकरे तृतीय - 82.60%

येण्याचा बहुमान मिळविला आणि सर्वच विद्यार्थ्यांनी जवळपास चांगले यश संपादन केले त्याबद्दल शाळेच्या वतीने सर्वांचे अभिनंदन करण्यात आले शाळेचे प्राचार्य श्री संजय फड सर व तसेच सरस्वती शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव श्री बालाजी माधवराव पांडागळे साहेब व तसेच एडवोकेट देवराव पांडागळे साहेब यांनी देखील त्यांना भ्रमणध्वनी द्वारे विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या व तसेच शाळेतील इतर शिक्षक वृंद व शिक्षकेतर कर्मचारी व तसेच सर्व गावकऱ्यांनी त्यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव केला.

# जायकवाडीच्या पाण्यासाठी शेतकरी काढणार जिल्हाधिकारी कार्यालयावर बैलगाडी मोर्चा

## शेतीला हक्काचे पाणी द्या, नदीजोड प्रकल्पाची मागणी

**दैनिक युवक आधार**

**तालुका प्रतिनिधी** : बीड जिल्ह्यातील दुष्काळी भागातील शेतीला जायकवाडी धरणाचे हक्काचे पाणी द्यावे व गोदावरी-सिंदफणा नदीजोड प्रकल्प तात्काळ करावा यासाठी जिल्ह्यातील शेतकरी जिल्हाधिकारी कार्यालयावर बैलगाडी मोर्चा काढणार आहेत. लोकलढा आंदोलनच्या मादळमोही येथील बैठकीत शेतकऱ्यांनी हा निर्णय घेतला.

बीड जिल्ह्यातील बहुतांश शेतीला जायकवाडी धरणाचे हक्काचे पाणी मिळत नाही, त्यामुळे शेतकऱ्यांना सातत्याने दुष्काळी परिस्थितीला सामोरे जावे लागते. बीड जिल्ह्यात दर दोन-



तीन वर्षांनी दुष्काळ पडतो तसेच पावसाचे प्रमाणही कमी आहे, यामुळे शेतकऱ्यांना सातत्याने पाणीटंचाईला सामोरे जावे लागते. महाराष्ट्रात व विशेषतः पश्चिम महाराष्ट्रात शेतीसाठी पाण्याच्या सुविधा मोठ्या प्रमाणावर उपलब्ध आहेत. बीड जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर शेती जायकवाडी धरणाच्या हक्काच्या पाण्यापासून वंचित आहे. शेतीला उन्हाळ्यात पाणी मिळत नसल्याने ऊस, भाजीपाला, फळबागा आदी पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होते. यामुळे बीड जिल्ह्यातील शेती सातत्याने तोट्यात जाऊन शेतकरी आत्महत्या, शेतकरी कर्जबाजारीपणा यासह इतर अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत. हे प्रश्न सोडवण्यासाठी शेतीला जायकवाडी धरणाचे व कृष्णा खोऱ्याचे हक्काचे पाणी मिळाले पाहिजे तसेच बीड जिल्ह्यात नदीजोड प्रकल्प प्राधान्याने होणे गरजेचे आहे. त्यासाठी गेल्या दोन वर्षापासून लोकलढा आंदोलन वेगवेगळ्या मार्गाने प्रयत्न करीत आहे. या आंदोलनातील शेतकऱ्यांची बैठक गेवराई तालुक्यातील मादळमोही येथील संत जगद्गुरु तुकाराम महाराज संस्थान येथे पार पडली. या बैठकीस लोकलढा आंदोलनातील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या बैठकीत लोकलढा आंदोलनाचा आढावा घेऊन पुढील दिशा ठरवण्यात आली.

महाराष्ट्र शासनाच्या वतीने 168 टीएमसी चा नदीजोड प्रकल्प करण्यात येत आहे. या प्रकल्पातून बीड जिल्ह्याला किती पाणी देणार तसेच नदीजोड प्रकल्प करण्यासाठी सर्वेक्षण करण्याची मागणी या बैठकीत करण्यात आली.

# नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या पिकांचे तत्काळ पंचनामा करा – आमदार विनोद अग्रवाल

**दैनिक युवक आधार**

**सचिन बन्सोड गोंदिया जिल्हा प्रतिनिधी** : मागील दोन ते तीन दिवसांपासून अचानक बदललेल्या हवामानामुळे आणि अवकाळी पावसामुळे रब्बी हंगामातील पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. यामुळे शेतकरी आर्थिक संकटात सापडले आहेत. शेतकऱ्यांनी रब्बी पिकांची पेरणी मोठ्या मेहनतीने केली होती, परंतु अचानक आलेल्या खराब हवामानामुळे पिकांचे मोठे नुकसान झाले व त्यांची मेहनत आणि खर्च व्यर्थ गेला.

शेतकरी चिंतित असल्याची माहिती मिळताच शेतकऱ्यांच्या मदतीसाठी सदैव तत्पर असलेले आमदार



विनोद अग्रवाल यांनी तत्काळ तुमखेडा व कारंजा परिसरातील नुकसानग्रस्त शेतांची पाहणी करून परिस्थितीची माहिती घेतली. या दरम्यान त्यांनी शेतकऱ्यांशी संवाद साधत त्यांच्या समस्या जाणून घेतल्या. अनेक शेतकऱ्यांनी अवकाळी पावसामुळे झालेल्या मोठ्या नुकसानाची व्यथा मांडली. या प्रसंगी उपविभागीय अधिकारी, तहसीलदार, जिल्हा कृषी अधिकारी, तहसील कृषी अधिकारी तसेच संबंधित तलाठी व कृषी सहाय्यक तसेच स्थानिक पदाधिकारी उपस्थित होते.

नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना शासनाकडून मदत मिळू शकेल, यासाठी आमदार विनोद अग्रवाल यांनी कृषी विभागाला तत्काळ पंचनामा करून शासनाला अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले. "अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले असून शासनाने नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना तत्काळ आर्थिक मदत उपलब्ध करून द्यावी," अशी मागणीही आमदार अग्रवाल यांनी केली.

या पाहणी दौऱ्यादरम्यान प्रमुखपणे आमदार विनोद अग्रवाल, पंचायत समिती सभापती मुनेश रहांगडाले, कृषी व पशुसंवर्धन सभापती दिपाताई चंद्रिकापुरे, उपविभागीय अधिकारी चंद्रभान खंडाईत, तहसीलदार समशेर पठान, अपर तहसीलदार श्रीकांत कांबळे, जिल्हा कृषी अधिकारी निलेश कानवडे, तहसील कृषी अधिकारी नेहा आढव, मंडळ महसूल अधिकारी, तलाठी, ग्रामसेवक, कृषी सहाय्यक, सरपंच व ग्रामपंचायत सदस्य उपस्थित होते.

# जि.प. हायस्कूल करखेलीने राखली उज्ज्वल निकालाची परंपरा; विद्यार्थ्यांच्या यशाने शाळेचा मान उंचावला

**दैनिक युवक आधार**

**धर्माबाद गिरमाजी सूर्यकार** : महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाकडून नुकताच दहावी परीक्षेचा निकाल जाहीर करण्यात आला असून धर्माबाद तालुक्यातील जिल्हा परिषद हायस्कूल करखेलीने पुन्हा एकदा आपल्या गुणवत्तेची छाप उमटवत उज्ज्वल निकालाची परंपरा कायम राखली आहे. शाळेचा एकूण निकाल तब्बल 83 टक्के लागला असून तालुक्यातील चार जिल्हा परिषद हायस्कूलमध्ये प्रथम क्रमांक पटकावून शाळेने उल्लेखनीय यश संपादन केले आहे.यंदा शाळेतील मराठी व उर्दू माध्यमातील एकूण 29 विद्यार्थ्यांनी दहावीची परीक्षा दिली होती.



त्यापैकी 24 विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून विद्यार्थ्यांच्या मेहनतीला व शिक्षकांच्या मार्गदर्शनाला यशाचे फळ मिळाले आहे. विद्यार्थ्यांच्या या यशामुळे पालक, शिक्षक व ग्रामस्थांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. यशस्वी विद्यार्थ्यांमध्ये कु. कावेरी साईनाथ पिकलेकर हिने 67 टक्के गुण मिळवत शाळेत प्रथम क्रमांक पटकावला. कु. माधुरी लक्ष्मण जंगलेकर हिने 63.80 टक्के गुणांसह द्वितीय, तर कृष्णा गणेश हामंद याने 63.60 टक्के गुण मिळवत तृतीय क्रमांक प्राप्त केला. तसेच कु. साधना गुड्डू धोरम व लिंगमेश्वर संजय कानगुलवार यांनीही उत्तीर्ण होत शाळेच्या यशात मोलाची भर घातली.विशेष म्हणजे हे विद्यार्थी धर्माबाद येथील युनिक कम्प्युटर संस्थेमध्ये एम.एस.सी.आय.टी. संगणक प्रशिक्षण घेत असून शिक्षणासोबत तंत्रज्ञानाचे ज्ञान आत्मसात करण्याचा प्रयत्न करीत आहेत. विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल जिल्हा परिषद हायस्कूल करखेलीचे उपक्रमशील शिक्षक श्री शिवकुमार पाटील यांनी पुढाकार घेत विद्यार्थ्यांचा सत्कार आयोजित केला.पोलीस स्टेशन धर्माबादचे कर्तव्यदक्ष पोलीस निरीक्षक श्री सदाशिव भडीकर यांच्या हस्ते विद्यार्थ्यांचा शाल, पुष्पहार व मिठाई देऊन गौरव करण्यात आला. यावेळी श्री भडीकर यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करत पुढील उच्च शिक्षणासाठी शुभेच्छा दिल्या तसेच जीवनात मोठे ध्येय ठेवून प्रामाणिक मेहनतीच्या जोरावर यश संपादन करण्याचे मार्गदर्शन केले.शाळेच्या या घवघवीत यशाबद्दल मुख्याध्यापक, शिक्षकवृंद, पालक तसेच ग्रामस्थांकडून विद्यार्थ्यांवर कौतुकाचा वर्षाव होत असून करखेली विद्यालयाने ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये गुणवत्ता आणि आत्मविश्वास निर्माण करण्याचे प्रेरणादायी कार्य केल्याची भावना व्यक्त होत आहे.

# कु पूर्वा गंगात्रे चे दहावी परीक्षेत 93 .60 गुण घेऊन शाळेत द्वितीय क्रमांक पटकावीला

**दैनिक युवक आधार**

**एम डी सुरोशे महागाव(यवतमाळ )** : शैक्षणिक सन 2025-26 फेब्रुवारी मार्च मध्ये घेण्यात आलेल्या 10 वी बोर्ड माध्यमिक शाळांत परीक्षा प्रमाणपत्र परीक्षेत कु पूर्वा अरविंद गंगात्रे हिने 93.60 गुण मिळवून शाळेत द्वितीय तर मुलींनं मधून प्रथम येण्याचा मान मिळवीला तर तिने कोणत्याही प्रकारचे शिकवणी वर्ग न लावता शाळेतील शिकवण आणी स्वतः चिकाटी व मेहनत करून हे यश संपादित केले ती अभ्यासा बरोबरच



कलेच्या क्षेत्रात पण निपुण आहे .ती आपल्या यशाचे श्रेय प्राचार्य व शिक्षक वृंद व पालक यांना देते मातोश्री विदयालय च्या वतीने पालकांसमवेत सत्कार करून तीला पुढील शिक्षणाकरिता शुभेच्छा देण्यात आल्या

# करंजाडे येथील नवीन स्मशानभूमींच्या बांधकामाचे काम प्रगतीपथावर..

## अंतर्गत रस्त्यांवर पुरेसे पथदिवे बसविण्याची मागणी

**दैनिक युवक आधार**

**पनवेल, (वार्ताहर) :** करंजाडे वसाहतीत एकच स्मशानभूमीमुळे नातेवाईकांना अंत्यसंस्कारासाठी इतर ठिकाणी जावे लागत होते. याबाबत नवीन स्मशानभूमी बांधावी अशी स्थानिक नागरिकांची मागणी होती. त्यानुसार आ. प्रशांत ठाकूर, महेश बालदी, प्रितम म्हात्रे यांच्या मार्गदर्शनाखाली माजी सरपंच रामेश्वर आंग्रे यांनी सिडकोकडे पाठपुरावा करून सिडकोकडून नवीन बांधकाम सुरु असून त्या बांधकामाचे काम प्रगतीपथावर आहे.सिडकोने करंजाडे वसाहतीची निर्मिती केली. मात्र सिडकोकडून सुविधासाठी अजूनही पाठपुरावा करावा लागतं आहे. करंजाडे वसाहतीमध्ये दोन सरण रॅक असलेली स्मशान आहे. मात्र वसाहतीत वाढती लोकसंख्या आणि जुन्या स्मशानभूमींची अपुरी क्षमता यामुळे नवीन स्मशानभूमीची मागणी जोर धरत आहे. त्याचबरोबर अंत्यसंसकारासाठी नातेवाईकांना कामोठे किंवा पनवेल महापालिका हद्दीत जावे लागत असल्याने गैरसोयीला सामोरे जावे लागत होते. याबाबत आमदार प्रशांत ठाकूर, महेश बालदी, माजी विरोधीपक्षनेते प्रितम म्हात्रे यांच्या मार्गदर्शनाखाली भाजप नेते करंजाडे ग्रामपंचायतीचे माजी सरपंच रामेश्वर आंग्रे यांनी सिडकोकडे वारंवार पत्रव्यवहारसह अखंड पाठपुरावा केला होता. अखेर सिडकोकडून नवीन स्मशानभूमीचे बांधकाम आणि अस्तित्वातील स्मशानभूमीची दुरुस्ती करण्याचे काम सध्या प्रगतीपथावर आहे. त्यामुळे आता अंत्यसंस्कारासाठी गैरसोयीला सामोरे जावे लागणार नाही.

स्मशानभूमीच्या मुख्य प्रवेशद्वारावर, अंतर्गत रस्त्यांवर पुरेसे पथदिवे बसवा..

स्मशानभूमीच्या मुख्य प्रवेशद्वारावर आणि अंतर्गत रस्त्यांवर पुरेसे पथदिवे, हाय-मास्ट दिव्यांची उभारणी करावी तसेच

अंत्यसंस्काराच्या ठिकाणी आणि वेटिंग हॉलमध्ये आवश्यक विद्युत उपकरणे व योग्य प्रकाश व्यवस्था करावी अशी मागणी भाजप नेते माजी सरपंच रामेश्वर आंग्रे यांनी सिडकोकडे पत्रद्वारे केली आहे.

# पुलावरील खड्ड्यांचे काम सुरू

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल वार्ताहर** : पनवेल शहरातील नानासाहेब धर्माधिकारी उड्डाण पुलावरील रस्त्यातील खड्डे भरण्याच्या कामाला सुरुवात करण्यात आली आहे. याची मागणी राष्ट्रवादी काँग्रेस युवक श.प.चे सचिव आदित्य जानोरकर यांनी केली होती. त्यांच्या मागणीला यश आले आहे. पनवेल शहरातील महत्त्वाचा उड्डाणपूल असलेला नानासाहेब धर्माधिकारी उड्डाणपुलावर अनेक ठिकाणी खड्डे पडले होते. तसेच या ठिकाणी असणाऱ्या लोखंडी पट्टीवरून अनेक दुचाकीस्वार घसरून पडल्याच्या घटना घडलेल्या आहेत. तसेच अनेक जण जखमी देखील झालेले आहेत. त्यामुळे प्रशासनाने खड्डे भरण्याची तसदी घेणे गरजेचे होते. तसेच या लोखंडी पट्टीसाठी देखील विशेष लक्ष देण्याची गरज होती. राष्ट्रवादी काँग्रेस युवकचे आदित्य जानोरकर यांनी यासंदर्भात पत्रव्यवहार केला.

# शिक्षणाची पुनर्संधी ठरली महिलांच्या आयुष्याला नवी दिशा

## रायगड जिल्ह्यात 482 महिला व मुलींनी मिळविले घवघवीत यश

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी रणिता ठाकूर उरण रायगड** : "शिक्षणाला वयाचे बंधन नसते" हे पुन्हा एकदा सिद्ध करत रायगड जिल्ह्यातील शेकडो महिला व मुलींनी आपल्या जिद्द, चिकाटी आणि मेहनतीच्या बळावर यशाचा नवा इतिहास घडविला आहे. मा. नेहा भोसले, मुख्य कार्यकारी अधिकारी, रायगड जिल्हा परिषद, अलिबाग यांच्या प्रेरणादायी संकल्पनेतून महिला व बालकल्याण विभाग, माध्यमिक शिक्षण विभाग, उमेद आणि प्रथम एज्युकेशन फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये "शिक्षणाची पुनर्संधी" (Second Chance Program) हा महत्त्वाकांक्षी उपक्रम यशस्वीरित्या राबविण्यात आला.





या उपक्रमांतर्गत विविध सामाजिक, आर्थिक व कौटुंबिक कारणांमुळे शिक्षण अर्धवट राहिलेल्या महिला व मुलींना पुन्हा शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचा प्रयत्न करण्यात आला. अनेकांनी संसार, जबाबदाऱ्या आणि संघर्ष यांच्यासोबत अभ्यासाची कसरत करत पुन्हा एकदा हातात पुस्तके घेतली आणि आपल्या स्वप्नांना नवसंजीवनी दिली.

महिलांना इयत्ता १० वीची परीक्षा देता यावी यासाठी १७ नंबर फॉर्म भरून देणे, अभ्यासाचे मार्गदर्शन, परीक्षा तयारी, समुपदेशन तसेच सातत्यपूर्ण पाठपुरावा करण्यात आला. या प्रयत्नांना अभूतपूर्व यश मिळाले असून एकूण ५०७ महिलांनी दहावी बोर्ड परीक्षा दिली. त्यापैकी तब्बल ४८२ महिलांनी यशस्वीरित्या परीक्षा उत्तीर्ण होत ९५% निकालाची उल्लेखनीय नोंद केली आहे.

विशेष म्हणजे, अंगणवाडी सेविका व मदतनीसांनीही या उपक्रमात उत्स्फूर्त सहभाग घेत प्रेरणादायी यश संपादन केले. परीक्षा दिलेल्या १८८ अंगणवाडी सेविकांपैकी १८१ सेविका उत्तीर्ण झाल्या असून, २९४ अंगणवाडी मदतनीसांपैकी २७६ मदतनीसांनी दहावीची परीक्षा यशस्वीपणे उत्तीर्ण केली आहे.

या यशामुळे अनेक महिलांच्या डोळ्यांत आत्मविश्वासाचे नवे स्वप्न फुलले असून शिक्षणाच्या माध्यमातून स्वावलंबनाचा मार्ग अधिक भक्कम झाला आहे. "आता पुढील शिक्षणही पूर्ण करायचे" अशी नवी उमेद आणि सकारात्मक ऊर्जा महिलांमध्ये निर्माण झाल्याचे दिसून आले.

या कार्यक्रमाच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी मा. निर्मला कुचिक, जिल्हा कार्यक्रम अधिकारी, महिला व बालकल्याण विभाग, अलिबाग, मा. महरुद्र नाळे, शिक्षणाधिकारी (माध्यमिक), मा. प्रियदर्शनी मोरे, प्रकल्प संचालक, उमेद तसेच प्रथम एज्युकेशन फाऊंडेशनच्या संपूर्ण टीमने विशेष परिश्रम घेतले. महिलांना सातत्याने प्रेरणा, शैक्षणिक मदत आणि मानसिक आधार देत त्यांच्या यशाचा मजबूत पाया उभारण्यात आला.

या उपक्रमाच्या मार्गदर्शिका मा. नेहा भोसले, मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सर्व यशस्वी विद्यार्थिनींना शुभेच्छा देताना सांगितले की, "हा उपक्रम महिलांच्या सशक्तीकरणाचा पाया अधिक मजबूत करणारा असून शिक्षणामुळे महिलांचा आत्मविश्वास, स्वाभिमान आणि समाजातील मानाचे स्थान अधिक उंचावत आहे."

कार्यक्रमातून यश संपादन करणाऱ्या सर्व महिला व मुलींचे हार्दिक अभिनंदन करण्यात आले असून रायगड जिल्हा परिषदेचे अध्यक्ष मा. मंगेश वाकडीकर, उपाध्यक्ष मा. मधुकर पाटील, शिक्षण सभापती मा. चंद्रकांत कळंबे, मुख्य कार्यकारी अधिकारी मा. नेहा भोसले तसेच शिक्षणाधिकारी (माध्यमिक) मा. महारुद्र नाळे यांनी तसेच प्रथम एज्युकेशन फाउंडेशन यांच्या वतीने सर्व यशस्वी विद्यार्थिनींचे अभिनंदन करून त्यांच्या उज्ज्वल शैक्षणिक, सामाजिक व वैयक्तिक भविष्यासाठी मनःपूर्वक शुभेच्छा व्यक्त केल्या आहेत.

# मुळाव्याच्या 'महाराष्ट्र इंग्लिश स्कूल'ची निकालात बाजी; सलग १०० टक्के निकालाची परंपरा कायम!

**दैनिक युवक आधार**

**उमरखेड तालुका प्रतिनिधी राजू गायकवाड (मोहदरी) :** महाराष्ट्र राज्य माध्यमिक मंडळ च्या इयत्ता 10 वी चा निकाल नुकताच लागला आहे.सदर निकालात वैश्विक विकास संस्था मुळावा द्वारा संचालित महाराष्ट्र इंग्लिश स्कूल मुळावा शाळेचा निकाल 100 टक्के लागला आहे.

परिसरात सर्वात जास्त 100 टक्के निकालाची परंपरा महाराष्ट्र इंग्लिश स्कूल ने राखली आहे.

सदर निकालाचे वैशिष्टे म्हणजे या निकालात शाळेतील 21 विद्यार्थ्यांपैकी तब्बल 11 विद्यार्थी हे विशेष प्राविण्यासह म्हणजेच 75 टक्के पेक्षा जास्त गुण घेऊन उत्तीर्ण झालेले आहेत. तसेच उर्वरित 10 विद्यार्थी हे प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झालेले आहेत.









प्रथम क्रमांक वरील तनिष्क शैलेश वाकडे हिने 89.20 गुण प्राप्त केले आहे.

द्वितीय क्रमांकासह प्राची नंदकिशोर गोरे हिने 85.60 तर तृतीय क्रमांकावर अक्षरा पांडुरंग देशमुख 81.20 व अस्मित अतुल कनवाळे 81.20 या दोघांनी समान गुण प्राप्त केले आहे. याशिवाय ईश्वरी बाळासाहेब देशमुख 79.40 , आकांक्षा किसन देशमुख 78.20, आरती गजानन हजारे 77.60 , श्रुती संजय वाकडे 76.80, राज दिगंबर दामोदर 76.40 , समृद्धी संतोष देशमुख 76.40 व पियुष दिलीप भालेराव 75.40 यांनी विशेष प्राविण्यासह गुण प्राप्त केले आहे.

विद्यार्थ्यांच्या या यशासाठी शाळेच्या विद्यार्थ्यांनी आपल्या यशाचे श्रेय शाळेतील मुख्याध्यापक व सर्व शिक्षक व पालकांना दिलेले आहे. विद्यार्थ्यांच्या घवघवीत यशासाठी शाळेचे पदाधिकारी , मुख्याध्यापक , शिक्षक , शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी कौतुक केले आहे.

# १६ मेपासून लाखनीत गृहगणनेचा बिगुल; १०४ गावांत प्रशासन सज्ज

**दैनिक युवक आधार**

**रोशन खोब्रागडे लाखनी** : आगामी जनगणनेच्या पार्श्वभूमीवर लाखनी तालुक्यातील १०४ गावांमध्ये १६ मेपासून प्रथम टप्प्यातील गृहगणनेच्या कामाला सुरुवात होत असून, या महत्त्वाकांक्षी मोहिमेसाठी प्रशासनाने व्यापक तयारी पूर्ण केली आहे. मुख्य जनगणना अधिकारी तथा तहसीलदार शीतल घावटे यांच्या नेतृत्वाखाली प्रगणक व पर्यवेक्षकांचे प्रशिक्षण यशस्वीरीत्या पार पडले असून, आता प्रत्यक्ष क्षेत्रीय कामासाठी यंत्रणा सज्ज झाली आहे.



२३ एप्रिलपासून सुरू झालेल्या प्रशिक्षण प्रक्रियेत एकूण पाच बॅचचे आयोजन करण्यात आले होते. ८ मे रोजी अंतिम बॅचचे प्रशिक्षण पूर्ण झाले. प्रशिक्षणादरम्यान प्रगणकांना प्रत्यक्ष 'डेमो'द्वारे मोबाईल ॲपचा वापर, माहिती संकलनाची अचूक पद्धत, तांत्रिक अडचणींचे निराकरण आणि क्षेत्रीय कामकाजातील बारकावे यांची सखोल माहिती देण्यात आली.

या मोहिमेसाठी तालुक्यात मजबूत प्रशासकीय यंत्रणा उभारण्यात आली असून, मुख्य जनगणना अधिकारी तहसीलदार, १ सहकारी अधिकारी, १ तांत्रिक सहाय्यक, ४ फिल्ड ट्रेनर, ३० पर्यवेक्षक आणि १५९ प्रगणक प्रत्यक्ष काम पाहणार आहेत. प्रशिक्षण प्रमुख म्हणून सहाय्यक महसूल अधिकारी मनीष अवसरे यांनी जबाबदारी सांभाळली. प्रशिक्षक म्हणून विवेक हजारे, मनीष मेश्राम, दर्याव खंडारे आणि अतुल वऱ्हाडे यांनी प्रगणक व पर्यवेक्षकांना मार्गदर्शन केले.

जनगणना प्रक्रिया अचूक, पारदर्शक आणि तांत्रिकदृष्ट्या सक्षम व्हावी, यासाठी प्रशासनाने सर्व स्तरांवर काटेकोर नियोजन केल्याचे दिसून येत आहे. १६ मेपासून सुरू होणाऱ्या गृहगणनेमुळे तालुक्यातील प्रत्येक घराची माहिती शासनाच्या नोंदीत समाविष्ट होणार असून, भविष्यातील विकास आराखड्यांसाठी ही माहिती महत्त्वपूर्ण ठरणार आहे.

# रेवदंडा सांडपाणी संकट; चार वर्षांपासून चोरपाइपलाइनमधून डेंग्यू-मलेरियाचा धोका

## जिल्हा परिषदेची दखल, पण ग्रामपंचायतीची लाचखोरी उघडकीस

**दैनिक युवक आधार**

**निलेश फुंडे अलिबाग रेवदंडा प्रतिनिधी** : रेवदंडा मारुती आळीत साईराज अपार्टमेंट व शेजारच्या सुमारे पाच घरांमधून चोरपाइपलाइनद्वारे चार-पाच वर्षांपासून दुर्गंधीयुक्त सांडपाणी थेट हरेश्वर क्रिकेट मैदानावर सोडले जाते. यामुळे मच्छरांची भीषण संख्या वाढली असून, डेंग्यू-मलेरिया-चिकनगुनिया सारख्या घातक रोगांचा धोका वाढला आहे. या मैदानाजवळ नाना-नानी पार्क, प्राथमिक मराठी शाळा, कान्होजी आंग्रेनगर व भरपूर वस्ती असल्याने लहान मुले, ज्येष्ठ नागरिक व ग्रामस्थांचे आरोग्य धोक्यात सापडले आहे. निरूपणकारांच्या घराजवळून दररोज महाराष्ट्रभरातून शेकडो भक्त-पर्यटक येतात – ही रोगराई पुरी, अलिबागपर्यंत पसरेल, याची जबाबदारी रेवदंडा ग्रामपंचायतीची व रायगड जिल्हा परिषदेची आहे का?

***तक्रार ते पाहणी* धक्कादायक पुरावे**

ॲड. रोहित भोईर यांनी रायगड जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागाकडे लेखी तक्रार नोंदवली. तक्रारीची तात्काळ दखल घेत डॉ. आशिष धरणकर व टीम घटनास्थळी पोहोचली. पाहणीत सांडपाण्याची चोरपाइपलाइन उघड झाली – साईराज अपार्टमेंटचे सांडपाणी तर येतच आहे, पण शेजारील घरांमधूनही वर्षानुवर्षे डिस्चार्ज होत आहे. डॉ. धरणकर म्हणाले, "दुर्गंधी व मच्छरांमुळे रोगराई पसरेल; तात्काळ कारवाई करू." ॲड. भोईर यांचे प्रतिनिधित्व तेजस शिंदे यांनी केले व अधिकाऱ्यांशी जोरदार चर्चा केली.ग्रामपंचायतीवर संतापाचा आंदोलनाचा इशारा



ग्रामस्थांत संतापाची लहर: "ग्रामपंचायत नवीन बिल्डिंगांना परवानगी देते, पण सांडपाणी व्यवस्था, गटार, सेप्टिक टँक किंवा पार्किंगची काहीच तरतूद नाही !तहसीलदार-जिल्हाधिकारी यांची लेखी NOC नसताना 'बंद पाकिटातील गुप्ता' (लाचखोरी) मध्ये बिल्डरांना मोकळीक? स्वच्छ भारत-सेवा गट योजना कागदावरच?" असा सवाल उपस्थित होतो. ग्रामस्थ म्हणतात, "रोगराईमुळे जगो-वा-मरोची वेळ! प्रशासनाने तात्काळ बिल्डरांवर FIR दाखल करावी, पाइपलाइन तोडावी व दंड आकारावा. अन्यथा रस्त्यावर उतरण्याची तयारी!" या चर्चेत ग्रामस्थ ॲड. भोईर यांचे आभार मानत आहेत.

कायद्याने शिक्कामोर्तब: कारवाई अपरिहार्य

महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५८ (कलम ५२) नुसार ग्रामपंचायतीने बिल्डिंग परवानग्या देताना सांडपाणी व्यवस्था बंधनकारक आहे. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ (MPCB) नियमांनुसार थेट सांडपाणी डिस्चार्ज हा पर्यावरणीय गुन्हा असून, ५ लाखांपर्यंत दंड व ५ वर्षांपर्यंत तुरुंगवास होऊ शकतो. रायगड जिल्हा परिषदेच्या पाणी व स्वच्छता विभागाने (जल जीवन मिशन) LWM (लिक्विड वेस्ट मॅनेजमेंट) अंतर्गत अशा प्रकरणांमध्ये तात्काळ कारवाई करण्याचे बंधन आहे. जिल्हाधिकारी व तहसीलदारांनी तक्रार नोंदवून ७ दिवसांत अहवाल सादर करावा.

भविष्यातील 'न्यायाची लढाई': आंदोलनाचा इशारा

ॲड. भोईर यांनी ठामपणे सांगितले, "कारवाई झाली नाही तर १५ मे पर्यंत प्रतीक्षा; मग जिल्हा परिषदेत आंदोलन, जिल्हाधिकाऱ्यांची भेट व MPCB-मध्ये तक्रार करीन. ग्रामस्थ-पर्यटकांना रोगराईपासून वाचवून निरोगी रेवदंडा घडवीन!" हे प्रकरण केवळ सांडपाण्याचे नसून, ग्रामीण आरोग्य व्यवस्थेचे गंभीर दुर्लक्ष आहे. शासनाने तात्काळ हस्तक्षेप करून न्याय द्यावा – बातमीतूनच कारवाई झालीच पाहिजे! ग्रामस्थांची ही लढाई यशस्वी होईल, असा विश्वास आहे.

# महाड तालुक्यात कामगार राज्य विमा योजनेचे क्लिनिक सुरू करण्याची मागणी

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल वार्ताहर :** महाड तालुक्यात कामगार राज्य विमा (इ एस आय) योजनेचे क्लिनिक सुरू करण्याची मागणी महाराष्ट्र राज्य सुरक्षा रक्षक श्रम कामगार युनियनचे सरचिटणीस विनायक गांधी यांनी भरत गोगावले, मंत्री यांच्याकडे पत्राद्वारे केली आहे. महाड तालुक्यात मोठ्या प्रमाणावर औद्योगिक तसेच असंघटित क्षेत्रातील कामगार कार्यरत आहेत. या कामगारांना आरोग्य सुविधांचा लाभ मिळावा यासाठी कामगार राज्य विमा योजना अत्यंत महत्त्वाचे आहे. मात्र तालुक्यात या योजनेअंतर्गत क्लिनिक उपलब्ध नसल्यामुळे कामगारांना उपचारासाठी दूरच्या ठिकाणी जावे लागते. त्यामुळे त्यांना आर्थिक आणि वेळेचा मोठा त्रास सहन करावा लागतो. महाड तालुक्यात ईएसआय क्लिनिक सुरू झाल्यास स्थानिक कामगारांना तत्काळ आणि दर्जेदार वैद्यकीय सुविधा उपलब्ध होतील आणि कामगारांच्या आरोग्य संरक्षणास मोठी मदत होईल आणि त्यांची कार्यक्षमता वाढेल. म्हणून संबंधित विभागाशी पाठपुरावा करून तालुक्यात लवकरात लवकर कामगार राज्य विमा योजनेचे क्लिनिक सुरू करावे अशी मागणी विनायक गांधी यांनी मंत्री भरत गोगावले यांच्याकडे केली.


सिद्धी प्रिंटर्स

दैनिक,सायंदैनिक, साप्ताहिक, मासिक, इत्यादी वर्तमानपत्राचे सर्व साइज मधे ब्लॉक, कलर व ४कलर प्रिंटींग वाजवी दरात करुन मिळेल.

वर्तमान पत्राचे सर्व साईज मधे आकर्षक डिझाईन मध्ये डीटीपी करून मिळेल

Call 9028240020 ,9220403509

# डॉ. अजय दादा धोंडे यांची महेश सहकारी साखर कारखाना चेअरमनपदी तर दादासाहेब जगताप यांची व्हाईस चेअरमनपदी बिनविरोध निवड

**दैनिक युवक आधार**

**बीड आष्टी प्रतिनिधी :मारुती सत्रे** : महेश सहकारी साखर कारखान्याच्या चेअरमनपदी डॉ. अजय दादा धोंडे यांची तर व्हाईस चेअरमनपदी दादासाहेब जगताप यांची बिनविरोध निवड झाल्याने परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. निवड प्रक्रियेनंतर उपस्थित संचालक मंडळ, सभासद व कार्यकर्त्यांनी जल्लोष करत नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन केले.

ही निवडणूक निवडणूक निर्णय अधिकारी भारती ठाकूर प्रादेशिक उप संचालक साखर छत्रपती संभाजी नगर, सहाय्यक निवडणूक अधिकारी बाळकृष्ण शिंदे सहायक निबंधक अहिल्या नगर यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडली. निवड प्रक्रिया शांततापूर्ण आणि उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली.

या निवडीनंतर कारखाना परिसरात अनेक मान्यवरांनी डॉ. अजय दादा धोंडे व दादासाहेब जगताप यांना शुभेच्छा देत आगामी काळात कारखान्याच्या प्रगतीसाठी उत्तम कार्य करण्याचा विश्वास व्यक्त केला.

यावेळी बोलताना माजी आमदार भीमरावजी धोंडे म्हणाले की, "महेश सहकारी साखर कारखाना हा



शेतकऱ्यांचा विश्वासाचा कारखाना आहे. शेतकरी हित डोळ्यासमोर ठेवून कारखान्याची वाटचाल सुरू आहे. नव्या संचालक मंडळाच्या माध्यमातून कारखान्याला अधिक सक्षम व प्रगत करण्यासाठी सर्वांनी एकजुटीने काम करावे. ऊस उत्पादक शेतकऱ्यांचे हित जपणे, कारखान्याची आर्थिक घडी मजबूत करणे व आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून कारखान्याची प्रगती साधणे हेच आमचे उद्दिष्ट राहील. संचालक मंडळातील सर्व सदस्य अनुभवी असून त्यांच्या सहकार्यामुळे कारखाना नव्या उंचीवर जाईल," असे त्यांनी सांगितले.

तसेच नवनिर्वाचित चेअरमन डॉ. अजय दादा धोंडे यांनी सर्व संचालक मंडळ, सभासद व कार्यकर्त्यांचे आभार मानले. "माझ्यावर टाकलेला विश्वास सार्थ ठरवत शेतकरी, कामगार आणि सभासद यांच्या हितासाठी प्रामाणिकपणे काम केले जाईल. कारखान्याच्या सर्वांगीण विकासासाठी सर्वांना सोबत घेऊन पुढे जाऊ," असे त्यांनी सांगितले.

यावेळी नवनिर्वाचित संचालक मंडळातील सदस्यांचा सत्कार करण्यात आला.

**नवनिर्वाचित संचालक मंडळ पुढीलप्रमाणे :**

मा. आ. श्री. भीमरावजी धोंडे साहेब, श्री. नियामत बेग साहेब, श्री. जगताप संभाजी महादेव, श्री. झगडे सतीश रभाजी, श्री. ॲड. निकाळजे रत्नदीप भिमराव, श्री. गणेश मारुतीराव सांगळे, श्री. शिंदे केशव मच्छिंद्र, श्री. चव्हाण झुंबर मारुती, श्री. कर्डिले बजरंग कोंडीबा, श्री. गावडे गजानन पांडुरंग, श्री. गर्जे शहादेव महादेव, श्री. विधाते उद्धव आनंदराव, श्री. खेडकर अशोक विष्णू, श्री. मोहोळकर तुकाराम रामू, श्री. मुंडे अंकुश चिंतामण, श्रीमती गोल्हार कांती संतोष, श्रीमती नन्नवरे उज्वला संजय, श्री. वाघुले बाबासाहेब गोरख, श्री. दिंडे सदाशिव केरू आदी उपस्थित होते यावेळी सूत्रसंचालन शिवाजी थोरवे आण्णा यांनी केले तर आभार नियमात बेग यांनी मानले

यावेळी कारखान्याचे कार्यकारी संचालक गिरीश झगडे, चीप अकाउंटंट सुरेश बोराटे , सोपानराव मुळे, नवनाथ भगत सुरक्षा अधिकारी, मुख्य शेतकी अधिकारी वीरेंद्र गर्जे, रवी भोजने सिव्हिल इंजिनियर, पांडुरंग गावडे माजी संचालक, चीफ केमिस्ट के.डी गर्जे,सभासद, शेतकरी, कार्यकर्ते व परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# वाकदमध्ये दोन तलवारींसह 'शोकाभाई' जेरबंद; एलसीबीची धडक कारवाई

**परिसरात तलवारींच्या धाकावर दहशत निर्माण करणाऱ्या गणेश मुकेविरुद्ध हत्यार कायद्यान्वये गुन्हा; शेतात लपवून ठेवलेल्या दोन जीवघेण्या तलवारी जप्त**

**दैनिक युवक आधार**

**करण धोंगडे वाशीम जिल्हा प्रतिनिधी** : ९ मे मालेगाव तालुक्यातील वाकद येथे दोन धारदार तलवारींच्या बळावर परिसरात दहशत निर्माण करणाऱ्या गणेश रामराव मुके उर्फ "शोकाभाई" (वय २८) याला वाशिमच्या स्थानिक गुन्हे शाखेने (एलसीबी) अटक केली. आरोपीच्या ताब्यातून दोन जीवघेण्या तलवारी जप्त करण्यात आल्या असून, या कारवाईमुळे परिसरातील नागरिकांनी मोठा दिलासा व्यक्त केला आहे.

स्थानिक गुन्हे शाखेला गुप्त माहिती मिळाली होती की, वाकद येथील गणेश मुके हा बेकायदेशीररीत्या धारदार शस्त्रे बाळगून परिसरात नागरिकांना धमकावत आहे. तलवारींच्या जोरावर तो दहशतीचे वातावरण निर्माण करत असल्याने



नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. या माहितीची खातरजमा केल्यानंतर एलसीबीच्या पथकाने तातडीने सापळा रचून आरोपीला ताब्यात घेतले.

पोलीस चौकशीदरम्यान आरोपीने आपल्या शेतात दोन तलवारी लपवून ठेवल्याची माहिती दिली. त्यानुसार पोलिसांनी आरोपीला सोबत घेऊन त्याच्या शेतात शोधमोहीम राबवली. या वेळी शेतात काळजीपूर्वक लपवून ठेवलेल्या दोन धारदार तलवारी जप्त करण्यात आल्या. या तलवारींचा वापर करून आरोपी परिसरात दहशत निर्माण करत असल्याचे प्राथमिक तपासात समोर आले आहे.

या प्रकरणी आरोपीविरुद्ध भारतीय हत्यार कायदा कलम ४ आणि २५ अन्वये मालेगाव पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक २५०/२०२६ दाखल करण्यात आला आहे. आरोपीला अटक करून पुढील तपास सुरू असून, त्याचा यापूर्वीच्या गुन्हेगारी घटनांशी काही संबंध आहे का, याचाही तपास पोलीस करत आहेत.

ही धडक कारवाई जिल्हा पोलीस अधीक्षक नितेश खाटमोडे-पाटील, अपर पोलीस अधीक्षक लता फड आणि सहाय्यक पोलीस अधीक्षक नवदीप अग्रवाल यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली.

कारवाईत स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक प्रदीप परदेशी, पोलीस अधिकारी निलेश जाधव तसेच एलसीबीच्या पथकातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी आणि बेकायदेशीर शस्त्र बाळगणाऱ्यांविरुद्ध कठोर कारवाई करण्याचा निर्धार पोलीस प्रशासनाने व्यक्त केला आहे. अशा प्रकारच्या धडक कारवायांमुळे गुन्हेगारी प्रवृत्तीच्या व्यक्तींना स्पष्ट संदेश मिळत असून, नागरिकांच्या सुरक्षेला सर्वोच्च प्राधान्य दिले जात असल्याचे पुन्हा अधोरेखित झाले आहे.

# पनवेलसाठी सिडकोने पाणी उपलब्ध करून द्यावे; खासदार श्रीरंग बारणे यांचे निर्देश

**दैनिक युवक आधार**

**पनवेल, (वार्ताहर)** : पनवेल महापालिका क्षेत्रात पाणी प्रश्न गंभीर झाला आहे. खारघर, तळोजा, कामोठे आणि कळंबोली परिसरासाठी वाढत्या लोकसंख्येला पाणी कमी पडत आहे. त्यामुळे सिडकोने या भागासाठी पाणी उपलब्ध करून द्यावे, अशी सूचना मावळचे शिवसेना खासदार श्रीरंग बारणे यांनी सिडको प्रशासनाला केली.

खासदार श्रीरंग बारणे यांनी बेलापूर येथील सिडको कार्यालयात सिडकोचे व्यवस्थापकीय संचालक विजय सिंघल व व्यवस्थापकीय उप संचालक गणेश देशमुख यांच्या समवेत मतदारसंघातील विविध प्रलंबित प्रश्नांबाबत बैठक घेतली. पनवेल शहरातील खारघर, तळोजा, कामोठे आणि कळंबोली परिसरासाठी वाढत्या लोकसंख्येच्या पार्श्वभूमीवर अतिरिक्त पाणी उपलब्ध करून देण्याची सूचना केली. तसेच पनवेल महानगरपालिका आणि सिडको संबंधित विविध प्रश्न, नागरी सुविधा आणि विकासकामांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. यावेळी शिवसेना जिल्हाप्रमुख रामदास शेवाळे, विनोद साबळे, महानगरप्रमुख प्रथमेश सोमण, अमर



म्हात्रे तसेच पदाधिकारी उपस्थित होते.

खासदार बारणे म्हणाले, पनवेल महापालिका क्षेत्रात पाणी प्रश्न गंभीर झाला आहे. खारघर, तळोजा, कामोठे आणि कळंबोली परिसरासाठी वाढत्या लोकसंख्येला पाणी कमी पडत आहे. या भागात सिडकोच्या परवानगीने मोठ्या प्रमाणात गृहप्रकल्प उभारले गेले आहेत. पनवेलमधील काही भाग सिडकोकडे होता. तो भाग आता महापालिकेत समाविष्ट झाला आहे. त्यामुळे पाण्याची समस्या सोडवण्याची मोठी जबाबदारी सिडकोची आहे. सिडकोकडे अतिरिक्त पाणी उपलब्ध आहे. सिडकोने अतिरिक्त पाणी पनवेल महापालिकेला द्यावे.

सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प कार्यान्वित करावेत. नागरीकरण मोठ्या प्रमाणात वाढत आहे. त्यादृष्टीने कचरा संकलन, वाहतुकीचे नियोजन करावे. वाढत्या नागरीकरणामुळे भविष्यात निर्माण होणाऱ्या गरजा लक्षात घेऊन नागरिकांना मूलभूत सुविधा अधिक सक्षम पद्धतीने उपलब्ध करून देण्यावर भर देण्याची सूचना खासदार बारणे यांनी केली.

पनवेलचे महापौर नितीन पाटील यांचीही खासदार श्रीरंग बारणे यांनी भेट घेतली. पनवेल शहरातील पाणीटंचाईच्या प्रश्नासंदर्भात सविस्तर चर्चा केली. वाढती लोकसंख्या आणि उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर नागरिकांना भेडसावणाऱ्या पाणी समस्यांवर तातडीने उपाययोजना करण्याबाबत यावेळी विविध मुद्द्यांवर चर्चा झाली. शहरातील पाणीपुरवठा अधिक सक्षम करण्यासाठी आवश्यक नियोजन, उपलब्ध संसाधनांचा योग्य वापर आणि भविष्यातील उपाययोजनांवर सकारात्मक चर्चा झाल्याचे खासदार बारणे यांनी सांगितले.

यावेळी स्थायी समिती अध्यक्ष बबन मुकादम, सभागृह नेते प्रकाश बिनेदार, विरोधी पक्षनेते अर्जुन म्हात्रे, शिवसेना जिल्हाप्रमुख नगरसेवक रामदास शेवाळे, महानगरप्रमुख तथा नगरसेवक प्रथमेश सोमण, कळंबोली शहरप्रमुख तुकाराम सरक, नगरसेवक चेतन भगत, हरीश केणी, सुमित झुजरराव उपस्थित होते.

# 19 वर्षीय तरुणी बेपत्ता

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल वार्ताहर** : सेक्टर 20, रोडपाली येथे घरकाम करण्यासाठी जाते असे सांगून घरातून निघून गेलेली 19 वर्षीय सोनाली धाकलू कचरे ही कामावर न जाता आणि घरीही परत न आल्याने ते हरवली असल्याची तक्रार कळंबोली पोलीस ठाण्यात करण्यात आली. तिची उंची पाच फूट, चेहरा उभट, रंग काळा सावळा, नाक बसके आहे. कानात आणि गळ्यात साधे डिझाईनचे दागिने घातले असून हनवटीवर आणि नाकाच्या डाव्या बाजूला काळया रंगाचा तीळ आहे. अंगात चॉकलेटी रंगाचा कुर्ता- टॉप आणि लेगीज घातली असून पायात साधी चप्पल घातली आहे.

# भराडी येथील ज्ञानविकास विद्यालयाचा दहावीचा निकाल ९७ .५८ टक्के ; भाग्यश्री घोंगटे प्रथम

**दैनिक युवक आधार**

**सिल्लोड** : तालुक्यातील भराडी येथील ज्ञानविकास विद्यालयाने यंदाच्या माध्यमिक शालांत (दहावी) परीक्षेत ९७.५८ टक्के निकाल नोंदवत आपली शैक्षणिक गुणवत्तेची उज्ज्वल परंपरा कायम राखली आहे. विद्यालयातील भाग्यश्री त्र्यंबक घोंगटे हिने ९४.४० टक्के गुण मिळवून विद्यालयात प्रथम क्रमांक पटकावण्याचा मान मिळविला. जिद्द, चिकाटी आणि सातत्यपूर्ण अभ्यासाच्या जोरावर विद्यार्थ्यांनी मिळविलेल्या या यशाचे सर्वस्तरातून कौतुक होत आहे.

विद्यार्थ्यांच्या या यशामागे 'ध्येय निश्चिती'चा अभिनव प्रयोग




कारणीभूत ठरला आहे. गेल्या वर्षी मे महिन्यात मुख्याध्यापक रायभान जाधव व वर्गशिक्षक डी. जी. देशमुख यांनी विद्यार्थ्यांना आपल्या क्षमतेनुसार अपेक्षित गुणांचे ध्येय निश्चित करून ते अभ्यास खोलीत लावण्याचे आवाहन केले होते. भाग्यश्री घोंगटे हिने ९५ टक्क्यांचे लक्ष निर्धारित केले होते, तिने ९४.४० टक्के गुण मिळवून हे ध्येय यशस्वीपणे साध्य केले.

प्रथम क्रमांक पटकाविणाऱ्या भाग्यश्री घोंगटे हिचा विशेष सत्कार जिल्हा परिषदेच्या सदस्या सौ. शिल्पाताई अशोकदादा गरुड आणि ॲड . श्रुतीदीदी अशोकदादा गरुड यांच्या हस्ते पुष्पगुच्छ देऊन करण्यात आला . यावेळी त्यांनी भाग्यश्रीच्या यशाचे कौतुक करून तिला पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. तसेच, इतर गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार संस्थेचे प्रमुख अशोकदादा गरुड, सहायक पोलीस उपनिरीक्षक किशोर रावसाहेब म्हस्के आणि ऋतुजा म्हस्के यांच्या हस्ते करण्यात आला.

**विद्यालयाची 'गुणवत्ता' यादी**

**भाग्यश्री त्र्यंबक घोंगटे: ९४.४०% (प्रथम)**
**सपना रामदास वाणी: ९३.००% (द्वितीय)**
**नवेद यायाखान पठाण: ९३.००% (द्वितीय)**
**शिवानी दत्तू महाजन: ९१.८०% (तृतीय)**
**अनुजा तातेराव काकडे: ९०.४०% (चतुर्थ)**
**पूनम कृष्णा वाघ: ९०.२०% (पाचवा)**

या यशाबद्दल सेवानिवृत्त शिक्षणाधिकारी एम. के. देशमुख, शिक्षण मंडळाचे अध्यक्ष अनिल साबळे, शिक्षण उपसंचालक कैलास दातखीळ, शिक्षणाधिकारी अश्विनी लाठकर, जयश्री चव्हाण, डॉ. आर . डी. कांबळे, शैलजा दराडे, मुख्याध्यापक रायभान जाधव, शिक्षकवृंद व पालकांनी अभिनंदन केले आहे. यावेळी अनिल दांडगे, मोबिन पठाण, तातेराव काकडे, सार्थक काकडे, रोहित वाणी, यश खोमणे, अनस पठाण, संदीप देशमुख, ज्ञानेश्वर देशमुख, गणेश ठोंबरे, सचिन कळम, कृष्णा सपकाळ आदींची उपस्थिती होती.

# आष्टीत इतिहास रचला!; गणित विषयात १०० पैकी ९९ गुण मिळवत शिवानंद डोंगरे चा महाविक्रम

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी विश्वदीप कांबळे** : आष्टी परिसरातील शैक्षणिक क्षेत्रासाठी अभिमानाची बाब ठरावी अशी उल्लेखनीय कामगिरी शिवानंद नवनाथ डोंगरे या विद्यार्थ्याने केली आहे. SSC बोर्ड परीक्षा मार्च 2026 (लातूर बोर्ड) गणितासारख्या कठीण समजल्या जाणाऱ्या विषयात तब्बल १०० पैकी ९९ गुण मिळवत त्याने घवघवीत यश संपादन केले असून परिसरात कौतुकाचा वर्षाव होत आहे.

आष्टीमधील सिम्बॉल ऑफ नॉलेज एज्युकेशन (संचालक: शंकर डोंबरे) या



कोचिंग क्लासचा विद्यार्थी तसेच जिल्हा परिषद हायस्कूल आष्टी शाळेत असलेल्या शिवानंदने कठोर परिश्रम, सातत्यपूर्ण अभ्यास, आत्मविश्वास आणि जिद्दीच्या बळावर हे नेत्रदीपक यश मिळवले आहे. विशेष म्हणजे गणित विषयात एवढे उच्च गुण प्राप्त करून त्याने परिसरातील विद्यार्थ्यांसमोर नवा आदर्श निर्माण केला आहे.

या यशामागे विद्यार्थ्याची चिकाटी, पालकांचे प्रोत्साहन तसेच संचालकाचे तसेच जि. प. हायस्कूल आष्टी येथील शिक्षकांचे मोलाचे मार्गदर्शन लाभल्याचे बोलले जात आहे. विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण व योग्य दिशा दिल्यास ग्रामीण भागातील विद्यार्थीही मोठे यश मिळवू शकतात, हे या निकालातून पुन्हा अधोरेखित झाले आहे.शिवानंद डोंगरे यांच्या या दैदिप्यमान यशाबद्दल शिक्षक, पालक, विद्यार्थी व परिसरातील नागरिकांकडून अभिनंदनाचा वर्षाव होत असून त्याच्या पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा देण्यात येत आहेत.

# समर्थ विद्यालय लाखनी येथे यशस्वी विद्यार्थ्यांच्या गुणगौरव सोहळा संपन्न

**दैनिक युवक आधार**

**भावेश धंधुकीया भंडारा जिल्हा प्रतिनिधी** : आज समर्थ विद्यालय लाखनी येथे माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचा गुणगौरव करण्यात आला. याप्रसंगी राष्ट्रीय शिक्षण संस्थेचे अध्यक्ष डॉ. उदय राजहंस तसेच संस्था सदस्य सुरेश कापगते, डॉ.श्याम झिंगरे उपस्थित होते यावर्षी ९८.३६ % निकाल लावून यशाची परंपरा विद्यार्थ्यांनी कायम ठेवली. माध्यमिक विभागात कु.योगेश्वरी जीवनदास गायधनी 95.20% गुण प्राप्त करून विद्यालयात प्रथम , कु.केशीनी केवळराम गायधनी 94.20% गुण प्राप्त करून विद्यालयात द्वितीय , कु.परी अनिल मांढरे 92.80% गुण प्राप्त करून विद्यालयात तृतीय क्रमांकाच्या मानकरी ठरल्या.तसेच याप्रसंगी सर्व विद्यार्थ्यांचा पुष्पगुच्छ व



पेढे देऊन गौरव करण्यात आला. तसेच विद्यार्थ्यांना शुभेच्छा देण्यात आल्या. विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले. संस्थेचे अध्यक्ष डॉ. उदय राजहंस यांनी आज कालच्या विद्यार्थ्यांना आत्मविश्वाश कसा वाढविता येईल हे मार्गदर्शनातून सांगितले तसेच तुम्ही यापेक्षा अधिक अभ्यास करुन आपला आत्मविश्वाश वाढवावा असे सांगितले .तसेच डॉ.श्याम झिंगरे, सुरेश जी कापगते ,पर्यवेक्षक अनिल बावनकुळे, सौ गायत्री भुसारी यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. विद्यालयाच्या मुख्याध्यापिका श्रीमती विभावरी निखाडे यांनी अध्यक्षीय मनोगतातून विद्यार्थ्यांनी मेहनत करून यश मिळवले आहे आणि विद्यालयाचा निकाल यावर्षी ९८.३५६% लागला आहे ही गोष्ट आमच्यासाठी अभिमानाची आहे तसेच विद्यार्थ्यांनी उच्च शिक्षणासाठी अधिक मेहनत करावी हे सांगितले. विद्यालयातील सर्व शिक्षक बंधू भगिनी आणि पालक वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार कु. वर्षा नानोटकर मॅडम यांनी केले. गुणवंत विद्यार्थ्यांचे अभिनंदन संस्थेचे उपाध्यक्ष शिवलाल रहांगडाले कार्यवाह ॲड. होमेश्वर रोकडे सेवानिवृत्त प्राचार्य अरविंद रामटेके, लाखनी तालुका पत्रकार संघाचे अध्यक्ष प्रा. नरेश वंजारी, विजुक्ता जिल्हा सचिव प्रा. अशोक गायधनी, सेवानिवृत्त प्राचार्य गोपाल कृष्ण गिरीपुंजे यांनी केले आहे.

# भीषण अपघातानंतर मृत्यूशी झुंज देणाऱ्या 36 वर्षीय तरुणाला मेडिकव्हरच्या डॉक्टरांनी दिले नवे आयुष्य

## दोन्ही पाय आणि हाताला गंभीर फ्रॅक्चर्स; वेळीच उपचारांनी टळले कायमस्वरूपी अपंगत्व

**दैनिक युवक आधार**

**पनवेल, (वार्ताहर) :** भीषण रस्ते अपघातात गंभीर जखमी झालेल्या 36 वर्षीय व्यक्तीवर नवी मुंबईतील खारघर येथील मेडिकव्हर हॉस्पिटलमध्ये यशस्वी उपचार करण्यात आले. अस्थिरोग विभागाचे संचालक डॉ. प्रमोद भोर यांच्या नेतृत्वाखाली टिमच्या प्रयत्नांना अखेर यश आले असून या रुग्णाला नवे आयुष्य मिळाले.

या अपघाताचा आघात इतका तीव्र होता की,रुग्णाला असह्य वेदना होत होत्या, त्याला हालचाल करणे अशक्य झाले होते आणि दीर्घकालीन अपंगत्वाचा धोका निर्माण झाला होता. वेळीच केलेल्या वैद्यकीय उपचारांमुळे आणि शरीराच्या विविध भागांवर केलेल्या गुंतागुंतीच्या शस्त्रक्रियेमुळे, डॉक्टरांच्या टिमला रुग्णाची प्रकृती स्थिर करण्यात यश आले. सध्या तो पूर्णपणे बरा होण्याच्या मार्गावर असून लवकरच तो पुर्ववत आयुष्य जगण्यास सुरुवात करेल.

नवी मुंबईतील तळोजा येथे राहणारे 36 वर्षीय श्री. भूषण एस. भालेकर हे 3 फेब्रुवारी 2026 रोजी रात्रीच्या वेळी खारघर येथील सेक्टर 35 एका रस्ते अपघाताने त्यांचे आयुष्य पूर्णपणे उलथवून टाकले. त्यांची स्कूटर आणि एक कार यांच्यात झालेल्या एका जोरदार धडकेत ते गंभीर जखमी झाले. या अपघातात त्यांच्या उजव्या मांडीचे, डाव्या पायाचे आणि डाव्या हाताच्या कोपरापुढील भागाचे हाड मोडले तसेच त्यांना शरीरावर अनेक ठिकाणी खोलवर जखमा आणि ओरखडेही आले होते. या अपघाताचा आघात इतका जबरदस्त होता की, त्यांना शरीराची कोणतीही हालचाल करणे अशक्य झाले होते; त्यांना असह्य वेदना होत होत्या आणि त्यांच्या शरीराच्या रचनेत झालेला बदल (विकृती) स्पष्टपणे दिसून येत होता. त्या अत्यंत गंभीर अवस्थेत, शरीराची अगदी सौम्य हालचाल करणेही त्यांना अशक्य झाले होते. 4 फेब्रुवारी 2026 च्या पहाटे त्यांना तातडीने मेडिकव्हर रुग्णालयात दाखल करण्यात आले. तिथे डॉ. प्रमोद तुकाराम भोर यांच्या



नेतृत्वाखालील तज्ज्ञ डॉक्टरांच्या टिमने रुग्णाच्या प्रकृतीचे गांभीर्य ओळखून तात्काळ उपचारांची सूत्रे हाती घेतली आणि त्याचे प्राण वाचवण्यासाठी आवश्यक अशी आपत्कालीन वैद्यकीय सेवा (शाशीसशपलू लरीश) सुरू केली.

खारघरच्या मेडिकव्हर हॉस्पिटल्स येथील अस्थिरोग विभागाचे संचालक डॉ. प्रमोद भोर म्हणाले, रुग्णालयात दाखल झाल्यावर रुग्ण शुद्धीवर आणि स्थिर होता, परंतु त्याला तीव्र वेदना होत होत्या, तसेच त्याच्या शरीरावर प्रचंड आघात आणि जखमा दिसत होत्या. सीटी स्कॅन आणि एक्स-रे यांसारख्या सविस्तर तपासण्यांमधून दोन्ही पाय आणि हाताच्या पुढच्या भागात गुंतागुंतीचे फ्रॅक्चर्स दिसून आले, ज्यामुळे यावर उपचार करणे अत्यंत आव्हानात्मक होते. दीर्घकालीन अपंगत्व टाळण्यासाठी अशा जखमांमुळे काळजीपूर्वक नियोजन आणि वेळीच शस्त्रक्रिया करणे आवश्यक असते. सखोल तपासणीनंतर, फ्रॅक्चर झालेली हाडं जोडण्यासाठी आणण्यासाठी एकाच वेळी अनेक शस्त्रक्रिया करण्याचा निर्णय घेतला.

डॉ. प्रमोद भोर पुढे म्हणाले, 4 फेब्रुवारी 2026 रोजी रुग्णावर गुंतागुंतीच्या शस्त्रक्रिया करण्यात आल्या, ज्यात हाड पुन्हा योग्य स्थितीत आणण्यासाठी आणि स्थिर करण्यासाठी ओआरआयएफ (ओपन रिडक्शन अँड इंटरनल फिक्सेशन), बोन ग्राफ्टिंग आणि बायकॉन्डिलर प्लेटिंग करण्यात आले .आम्ही सर्व फ्रॅक्चर झालेली हाडं पुन्हा योग्य स्थितीत आणण्यासाठी मिनीमली इन्व्हेसिव्ह शस्त्रक्रिया तंत्राचा वापर केला, ज्यामुळे कमीत कमी रक्तस्त्राव आणि लवकर बरे होण्याची शक्यता वाढली. शरीराच्या वेगवेगळ्या भागांतील अनेक फ्रॅक्चर्स हाताळणे नेहमीच आव्हानात्मक असते, कारण त्यासाठी शस्त्रक्रियेतील अचूकता आणि रुग्णाची एकूण स्थिरता यांच्यात संतुलन साधावे लागते.

या प्रकरणात, आम्ही प्रगत इम्प्लांट्सचा वापर केला, ज्यामुळे रुग्णाला हालचाल करणे शक्य होते आणि बरे होण्याचे परिणाम अधिक चांगले आहेत. ही प्रक्रिया पूर्ण होण्यासाठी सुमारे 3-4 तास लागले. वेळीच उपचार न केल्यास, अशा दुखापतींमुळे कायमचे अपंगत्व, दीर्घकालीन वेदना किंवा संसर्ग आणि सांधेदुखी यांसारख्या गुंतागुंती निर्माण होऊ शकल्या असत्या. शस्त्रक्रियेनंतर, रुग्णाला तज्ज्ञांच्या निरीक्षणाखाली ठेवण्यासाठी आयसीयूमध्ये दाखल केले आणि अँटीबायोटिक्स, वेदना व्यवस्थापन आणि ठराविक उपचारांनी सुरू करण्यात आले. शस्त्रक्रियेनंतरची काळजी देखील तितकीच महत्त्वाची आहे, ज्यामध्ये संसर्ग नियंत्रण, फिजिओथेरपी आणि हळूहळू शारीरिक हालचाल सुरू करणे यांचा समावेश होतो. शस्त्रक्रियेच्या दुसऱ्या दिवशी रुग्णाची फिजिओथेरपी सुरू करण्यात आली.

रुग्णाच्या प्रकृतीत हळूहळू सुधारणा दिसून आली आणि त्याच्यावर फिजिओथेरपी, श्वासोच्छवासाचे व्यायाम तसेच शारीरिक हालचालींसाठी विशेष आधार देण्यात आला. जवळपास दोन आठवड्यांच्या अतिदक्षता विभागातील देखरेखीनंतर, 17 फेब्रुवारी 2026 रोजी त्याला स्थिर अवस्थेत घरी सोडण्यात आले. रुग्णाला फिजिओथेरपी सुरू ठेवण्याचा, नियमित फॉलोअप करण्याचा आणि जखमेची योग्य काळजी घेण्याचा सल्ला देण्यात आला. पाठपुराव्यासाठी (फॉलो-अपसाठी) आलेल्या तपासणीत, रुग्णाच्या प्रकृतीत सुधारणा दिसून आली आणि त्याच्या शारीरीक हालचालींमध्ये देखील प्रगती होत असल्याचे दिसून आले, असे डॉ. प्रमोद भोर यांनी स्पष्ट केले.

आपला अनुभव सांगताना श्री. भूषण एस. भालेकर म्हणाले, त्या एका रात्रीने माझे आयुष्य पूर्णपणे बदलून टाकले. अपघातानंतर झालेली वेदना आणि मनात दाटलेली भीती मला आजही आठवते; मी पुन्हा कधी चालू शकेन की नाही, हे मला त्यावेळी समजत नव्हते. अगदी साध्या-सुध्या हालचाली करणेही त्यावेळी अतिशय वेदनादायी होते. परंतु, मेडिकव्हरमधील डॉक्टरांनी मला आत्मविश्वास आणि आशेचा किरण दिला. आता मी इतरांच्या मदतीने बसू शकतो आणि हालचाल करू शकतो. मी डॉ. भोर आणि त्यांच्या संपूर्ण टीमचा मनापासून आभारी आहे.

# गुणवत्तेची परंपरा कायम; अल-अमीन उर्दू व सेमी माध्यम विद्यालयाचा दहावीला शतप्रतिशत निकाल

**दैनिक युवक आधार**

**देवणी तालुका प्रतिनिधी पांडुरंग कदम :** देवणी शहरातील सहशिक्षक मुजीब शेख उदगीर शाळेत सेवेत कार्यरत असून येथील अल-अमीन माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाने फेब्रुवारी २०२६ मध्ये घेण्यात आलेल्या दहावी परीक्षेत शंभर टक्के निकालाची उल्लेखनीय कामगिरी नोंदवत गुणवत्तेची उज्ज्वल परंपरा कायम राखली आहे. आदर्श शिक्षक तथा इस्लाम धर्म प्रसारक म्हणून ओळखले जाणारे मुजीब शेख यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यालयाने यंदाही उत्कृष्ट यश संपादन केले.




विशेष म्हणजे उर्दू माध्यमासह सेमी इंग्रजी माध्यमाचाही निकाल १०० टक्के लागला. सेमी इंग्रजी माध्यमातून मोमीन अब्दुल रसूल सुलेमान याने ९४ टक्के गुणांसह प्रथम क्रमांक मिळविला, तर उर्दू माध्यमातून मोहम्मद हस्सान मोहम्मद मोहियोद्दीन याने ९२.४० टक्के गुणांसह प्रथम क्रमांक पटकावला.

तसेच हाशमी सिदरतूल मुन्तेहा हिने ९३.८० टक्के गुणांसह द्वितीय, सय्यदा हबीबा जाकेर हुसेन हिने ९१.४० टक्के गुणांसह तृतीय, तर शेख सुबिया सदफ हिने ८९.८० टक्के गुणांसह चौथा क्रमांक मिळविला.

यंदा विद्यालयातून १३६ विद्यार्थी परीक्षेला बसले होते. त्यापैकी ५ विद्यार्थ्यांनी ९० टक्क्यांपेक्षा अधिक गुण मिळविले. तसेच ३७ विद्यार्थी विशेष प्राविण्यासह, ४० प्रथम श्रेणीत, ४३ द्वितीय श्रेणीत व १६ विद्यार्थी यशस्वी श्रेणीत उत्तीर्ण झाले.

या यशामागे विद्यार्थ्यांची मेहनत, शिक्षकांचे मार्गदर्शन, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे सहकार्य तसेच पालकांचा पाठिंबा महत्त्वाचा ठरल्याचे विद्यालय प्रशासनाने सांगितले. प्राचार्य गुलाम गौस खान यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. तसेच अल-अमीन एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष डॉ. इसा खान व सचिव शेख मोहम्मद अकबर यांनीही विद्यार्थ्यांसह शिक्षक व कर्मचाऱ्यांचे अभिनंदन केले.

# भ्रष्ट अधिकाऱ्यावर कारवाई करा'; डॉ. जयंत भोईर यांची महसूल मंत्र्यांकडे तक्रार

**दैनिक युवक आधार**

**पनवेल प्रतिनिधी :** मोर्बे येथील सर्व्हे क्रमांक ६८/१अ जमीन प्रकरणात नियमबाह्य निर्णय घेतल्याचा आरोप करत डॉ. जयंत अर्जुन भोईर यांनी पनवेलचे तहसिलदार जितेंद्र इंगळे यांच्याविरोधात थेट राज्याच्या महसूल मंत्र्यांकडे तक्रार दाखल केली आहे. संबंधित अधिकाऱ्याने न्यायालयीन आदेश, महसूल मंत्र्यांचे निर्देश आणि उपविभागीय अधिकाऱ्यांच्या निर्णयाकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करून स्वार्थापोटी चुकीचा निर्णय दिल्याचा गंभीर आरोप या तक्रारीत करण्यात आला आहे.डॉ. भोईर यांनी दिलेल्या माहितीनुसार, मोर्बे येथील सर्व्हे क्रमांक ६८/१अ ही जमीन रियलसेल्स इन्फ्रास्टक्चर प्रा.लि. कंपनीने २०१२ मध्ये खरेदी केली होती. मात्र मुंबई कुळवहिवाट व शेतजमीन अधिनियमातील कलम ६३ अंतर्गत आवश्यक परवानगी न घेतल्यामुळे संबंधित व्यवहाराची नोंद ७/१२ उताऱ्यावर झाली नव्हती. त्यानंतर महसूल मंत्र्यांनी १० सप्टेंबर २०१५ रोजी कलम ८८(१)(ब) अंतर्गत अधिसूचना मंजूर केली होती.

या आदेशाच्या आधारे उपविभागीय अधिकारी, पनवेल यांनी फेरफार क्रमांक २३७० मंजूर करून संबंधित जमीन खरेदीदाराच्या नावावर करण्याचे आदेश ७ नोव्हेंबर २०२५ रोजी दिले होते. याचदरम्यान, डॉ. भोईर आणि काजलकिरण कटारिया यांच्यात जमीन व्यवहाराबाबत १९ फेब्रुवारी २०२४ रोजी साठेकरार झाला होता. व्यवहारात टाळाटाळ होत असल्याने डॉ. भोईर यांनी पनवेल येथील दिवाणी न्यायालयात दावा दाखल केला होता. न्यायालयाने १५ नोव्हेंबर २०२५ रोजी अंतिम निर्णय होईपर्यंत संबंधित जमिनीबाबत मनाई हुकूम जारी केला होता.

तक्रारीनुसार, न्यायालयाच्या आदेशाची ७/१२ उताऱ्यावर नोंद करण्यासाठी अर्ज करूनही तहसिलदारांनी त्याची दखल घेतली नाही. तसेच अप्पर तहसिलदारांच्या न्यायालयात रियलसेल्स इन्फ्रास्टक्चर कंपनीने दाखल केलेल्या लेखी म्हणण्यातही महसूल मंत्र्यांच्या आदेशाचा आणि कायदेशीर प्रक्रियेचा उल्लेख करण्यात आला होता. तरीदेखील संबंधित अधिकाऱ्यांनी जाणूनबुजून त्या मुद्द्यांकडे दुर्लक्ष केल्याचा आरोप करण्यात आला आहे.

याशिवाय मंडळ अधिकारी मोर्बे यांनी १८ मार्च २०२६ रोजी सादर केलेल्या अहवालात उपविभागीय अधिकाऱ्यांच्या आदेशानुसार फेरफार मंजूर झाल्याचे स्पष्ट नमूद केले होते. मात्र, हा अहवालदेखील दुर्लक्षित करण्यात आल्याचे डॉ. भोईर यांनी म्हटले आहे.

तक्रारीत तहसिलदार जितेंद्र इंगळे यांच्यावर भ्रष्टाचाराचेही गंभीर आरोप करण्यात आले असून, "अशा अधिकाऱ्यांमुळे महसूल खात्याची प्रतिमा मलिन होत आहे. संबंधित अधिकाऱ्यावर तात्काळ कठोर कायदेशीर कारवाई करावी," अशी मागणी महसूल मंत्र्यांकडे करण्यात आली आहे.

# निर्भय व युवा ग्रामीण पत्रकार संघाचा वर्धापन दिन ५ जूनला

## माहूर येथे पत्रकारांचा सन्मान सोहळा

**सामान्य नागरिकांच्या न्याय हक्कासाठी लढणाऱ्या पत्रकारांचा गौरव राष्ट्रीय अध्यक्ष गणेश कचकलवार यांच्या संकल्पनेतून संघटनेची स्थापना, राज्यभरातील पत्रकारांना निमंत्रण**

**श्रीक्षेत्र माहूरगड (प्रतिनिधी) सय्यद इसा :** निर्भय व युवा ग्रामीण पत्रकार संघाच्या वर्धापन दिनानिमित्त विविध क्षेत्रात नाविन्यपूर्ण कामगिरी करणाऱ्या मान्यवरांसह उत्कृष्ट पत्रकारिता करणाऱ्या पत्रकार बांधवांचा सन्मान सोहळा श्रीक्षेत्र माहूर येथे आयोजित करण्यात आला आहे.शहर व ग्रामीण भागात पत्रकारिता करताना पत्रकारांना समाजकंटकांकडून त्रास सहन करावा लागतो. तसेच सामान्य नागरिकांच्या न्याय हक्कासाठी लढताना अनेक अडचणींना सामोरे जावे लागते. या पार्श्वभूमीवर शहर व ग्रामीण



पत्रकारांना एक व्यासपीठ मिळावे, त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहता यावे, या उद्देशाने राष्ट्रीय अध्यक्ष गणेश कचकलवार यांच्या संकल्पनेतून 'निर्भय व युवा ग्रामीण पत्रकार संघ' या संघटनेची स्थापना करण्यात आली.या संघाचा वर्धापन दिन येत्या ५ जून रोजी आहे. या दिवसाचे औचित्य साधून विविध क्षेत्रात उत्कृष्ट काम करणाऱ्या मान्यवरांचा सन्मान सोहळ्याचे आयोजन ५ जून रोजी माहूर येथे करण्यात आले आहे. उत्कृष्ट पत्रकार, सामाजिक, क्रीडा, शैक्षणिक, कृषी, आरोग्य, उद्योग, अध्यात्म, कायदेविषयक व इतर क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींचा तसेच निर्भयपणे व निःपक्षपातीपणे पत्रकारिता करणाऱ्या शहरी व ग्रामीण पत्रकारांचा यावेळी सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात येणार आहे. पत्रकार हा लोकशाहीचा खरा चौथा स्तंभ आहे. तो तळागाळातील प्रश्नांना वाचा फोडतो. मात्र, त्याला संरक्षण व सन्मान मिळत नाही. त्यामुळे आम्ही ही संघटना उभी केली. या सोहळ्याच्या माध्यमातून चांगले काम करणाऱ्यांना प्रोत्साहन मिळेल असे प्रतिपादन राष्ट्रीय अध्यक्ष गणेश कचकलवार यांनी केले. या वर्धापन दिन व सन्मान सोहळ्याला महाराष्ट्रातील सर्व पत्रकार बांधवांनी,तसेच महाराष्ट्रातील निर्भय व युवा ग्रामीण पत्रकार संघाच्या पदाधिकाऱ्यांनी व सभासदांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन राष्ट्रीय अध्यक्ष गणेश कचकलवार यांनी केले आहे. कार्यक्रमाची जय्यत तयारी माहूर येथे सुरू आहे.

# पोयंजे मंडळ अंतर्गत जिल्हा परिषद प्राथमिक शाळा बारवई येथे महाराजस्व शिबिर संपन्न

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल वार्ताहर :** छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर अभियान टप्पा क्रमांक 1 ची अंमलबजावणी करण्याकरता अपर तहसिल पनवेल यांच्या कार्यक्षेत्रात 7 मार्च ते 8 मे दरम्यान मंडळ स्तरावरती एकूण पाच शिबिराचे आयोजन करण्यात आले. पाचवे व अंतिम शिबिर पोयंजे महसूल मंडळामध्ये रायगड जिल्हा परिषद प्राथमिक शाळा बारवई मैदान येथे 8 मे रोजी ठीक आयोजित करण्यात आले. या कार्यक्रमासाठी पवन चांडक, उपविभागीय अधिकारी पनवेल, जितेंद्र इंगळे, अपर तहसीलदार पनवेल ,निवासी नायब तहसीलदार संभाजी शेलार व इतर मान्यवर उपस्थित होते.

उपस्थित इतर प्रशासकीय विभागाकडील अधिकारी यांनी आपापल्या विभागाकडील योजनांची माहिती दिली. तसेच स्टॉल लावून शासनाच्या विविध प्रकारचे दाखले व योजना नागरिकांना लाभ देण्याकरिता सोय उपलब्ध करून देण्यात आली. विशेष बाब म्हणुन भिंगार गावच्या स्थानिक महिला बचत गटाच्या भगिनींनी पुढाकार घेवुन तेथे घरगुती



उपयोगी वस्तू, धान्य व इतर साहित्य यांचे स्टॉल लावून विक्रीसाठी तरतुद केली. या अभियानात महसूल विभागाकडील सेवा यांची माहिती देण्यात आली व अर्ज दाखल करुन घेण्यात आले.

प्रलंबित असलेले फेरफार निकाली काढणे, 7/12 मधील चुकांची दुरुस्ती, डिजिटल स्वाक्षरीचे सातबारा, 8 अ वाटप, उत्पन्न प्रमाणपत्र, रहिवासी आदिवास प्रमाणपत्र, जातीचे प्रमाणपत्र, नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र, अकृषिक तरतुदींबाबत मार्गदर्शन व सुधारणा (42 ते 47) कलम सनद प्रक्रियेची माहिती, सामाजिक अर्थसहाय्य योजना लाभ मंजुरी, विद्यार्थ्यांना दाखले वाटप, तुकडेबंदी कायदा सुधारणा, पानंद रस्ता, सर्वांसाठी घरे पट्टेवाटप, ॲग्रीस्टॅग नोंदणी, पी एम किसान नोंदणी, कमी जास्त पत्रक दप्तर अद्यावत, भूमी अभिलेख यांच्याकडील डिजिटल सेवांचा प्रसार व जनजागृती, नगर भूमापन गावठाण भूमापन व स्वामित्व अंतर्गत फेरफार प्रकरणे, भूसंपादन व अकृषीक प्रकरणात कमी जास्त पत्रक तयार करणे, ई मोजणी 2.0 प्रणाली, महाभुमी पोर्टल विषयी जनजागृती करण्यात आली.

या कार्यक्रमास जिल्हा परिषद सदस्य, पंचायत समिती सदस्य, पोयंजे मंडळातील सर्व आजी माजी सरपंच व सदस्य , पोलीस पाटील, आशा वर्कर, अंगणवाडी सेविका, वैशाली पाटील, उपअधीक्षक भूमी अभिलेख नैना प्राधिकरण व त्यांचे सहकारी उपस्थित होते. त्यांनी त्यांच्या कार्यालयाच्या स्तरावरील नागरिकांना आवश्यक सर्व वेबसाईटची माहिती दिली. ऑनलाईन सुविधांची माहिती दिली. संभाजी शेलार, निवासी नायब तहसीलदार यांनी महसूल मधील विविध कामांची व योजनांची माहिती दिली. कार्यक्रमाचा भाग म्हणुन प्रातिनिधीक स्वरुपात जात प्रमाणपत्र, वय व अधिवास प्रमाणपत्र, स्थानिक वास्तव्य प्रमाणपत्र अशा विविध दाखल्यांचे या ठिकाणी वाटप करणेत आले, तसेच नवीन अर्ज दाखल करुन घेण्यात आले. यावेळी महात्मा गांधी मिशन वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय यांच्या सहकार्यातून रक्तदान शिबीर घेण्यात आले व ग्रामस्थानी रक्तदान केले. तसेच प्राथमिक आरोग्य केंद्र अजिवली उपकेंद्र पोयंजे यांचेमार्फत आरोग्य तपासणी करण्यात आली. तसेच भिंगार गावचे माजी सरपंच बाळाराम धर्मा फडके व त्यांचे इतर बालकलाकार यांनी सदर अभियानाची माहिती आपल्या वासुदेव नृत्यातून दिली. यानंतर उपविभागीय अधिकारी पनवेल पवन चांडक यांनी छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर अभियान टप्पा क्रमांक 1 ची अंमलबजावणी करणेबाबत सर्व नागरीकांना मार्गदर्शन केले.

# जे. एम. म्हात्रे चॅरिटेबल संस्थेच्या तिन्ही शाळांचा दहावीचा शंभर टक्के निकाल – ग्रामीण भागातील इंग्रजी शिक्षणाची परंपरा अधिक भक्कम

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल वार्ताहर :** जे. एम. म्हात्रे चॅरिटेबल संस्था संचलित हिमांशू दिलीप पाटील इंग्लिश मिडियम स्कूल, न्यू इंग्लिश मिडियम स्कूल तसेच पदाजी पांडुरंग मुंबाईकर इंग्लिश मिडियम स्कूल अँड ज्युनियर कॉलेज या तिन्ही विद्यालयांचा इयत्ता दहावीचा मार्च २०२६ परीक्षेचा निकाल अत्यंत उल्लेखनीय लागला असून तिन्ही शाळांनी शंभर टक्के निकालाची उज्ज्वल परंपरा कायम राखली आहे.

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना दर्जेदार इंग्रजी माध्यमाचे शिक्षण उपलब्ध व्हावे, ग्रामीण विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास निर्माण व्हावा आणि शहरांप्रमाणेच आधुनिक शिक्षणाच्या संधी गावागावात पोहोचाव्यात या दूरदृष्टीतून संस्थेचे संस्थापक जे. एम. म्हात्रे यांच्या विचारातून या शाळांची निर्मिती करण्यात आली होती. शिक्षणाच्या माध्यमातून ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचे भविष्य घडविण्याचा संस्थेचा संकल्प आजही यशस्वीपणे पुढे नेला जात असल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

तिन्ही विद्यालयांतील सर्व विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून विद्यार्थ्यांच्या या यशामुळे परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. संस्थेचे पदाधिकारी, शिक्षकवृंद, पालक व नागरिकांकडून विद्यार्थ्यांवर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

हिमांशू दिलीप पाटील इंग्लिश मिडियम School मधील गुणवंत विद्यार्थ्यांमध्ये —

कु. श्वेता प्रभुनाथ पटेल – ८९ टक्के

कु. महिमा जनार्दन गावडे – ८९ टक्के

कु. रुद्राणी द्वारकानाथ पाटील – ८९ टक्के

या विद्यार्थिनींनी संयुक्तरीत्या प्रथम क्रमांक पटकावला.

तसेच —

प्रिन्स कुमार दिनेश मंडल – ८२.६० टक्के

रश्मित रुपेश कांबळे – ८२ टक्के

या विद्यार्थ्यांनीही उल्लेखनीय यश संपादन केले.

तर न्यू इंग्लिश मिडियम स्कूल मधील



गुणवंत विद्यार्थ्यांमध्ये —

कु. रिया मनोज शेख्री – ८२.२० टक्के

आदित्य रजनीश भारतीय – ७९ टक्के

कु. तृष्णा संतोष नेवरेकर – ७५ टक्के

या विद्यार्थ्यांनी विशेष यश संपादन करून विद्यालयाचा गौरव वाढविला आहे.

तसेच पदाजी पांडुरंग मुंबाईकर इंग्लिश मिडियम स्कूल अँड ज्युनियर कॉलेज मधील गुणवंत विद्यार्थ्यांमध्ये —

कु. प्राजक्ता दीनानाथ ठाकूर – ८९.४० टक्के

मास्टर शौर्य शैलेश पाटील – ८९.२० टक्के

कु. गीतिका मेघनाथ पाटील – ८८.४० टक्के

या विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन करून विद्यालयाचा नावलौकिक वाढविला आहे.

विद्यालयांच्या मुख्याध्यापकांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करताना सांगितले की, विद्यार्थ्यांनी सातत्यपूर्ण अभ्यास, शिक्षकांचे मार्गदर्शन आणि पालकांच्या

> **“विद्यार्थ्यांनी मिळवलेले हे यश केवळ गुणांपुरते मर्यादित नसून त्यांच्या मेहनती, शिस्त आणि जिद्दीचे प्रतीक आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण मिळावे हा संस्थेचा नेहमीच प्रयत्न राहिला आहे. पुढील काळातही संस्थेच्या माध्यमातून शैक्षणिक गुणवत्ता, संस्कार आणि विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास याला प्राधान्य देत असेच उत्कृष्ट निकाल कायम राखण्याचा आमचा संकल्प आहे.”**
>
> **— श्री. प्रितम जनार्दन म्हात्रे अध्यक्ष,जे. एम. म्हात्रे चॅरिटेबल संस्था**

सहकार्याच्या जोरावर हे यश मिळविले आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी मेहनत, शिस्त आणि जिद्दीच्या जोरावर उत्कृष्ट निकाल मिळवत एक आदर्श निर्माण केला आहे.

तिन्ही विद्यालयांमध्ये विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेबरोबरच व्यक्तिमत्त्व विकास, इंग्रजी माध्यमातील आत्मविश्वास, स्पर्धा परीक्षा तयारी, संस्कारमूल्ये आणि सर्वांगीण विकासावर विशेष भर दिला जात असल्याचे यावेळी सांगण्यात आले.या यशामागे शिक्षकांचे सातत्यपूर्ण मार्गदर्शन, पालकांचे सहकार्य आणि विद्यार्थ्यांची मेहनत हे महत्त्वाचे घटक ठरल्याची भावना विद्यालय व्यवस्थापनाकडून व्यक्त करण्यात आली.तिन्ही विद्यालयांच्या शंभर टक्के निकालामुळे रायगड जिल्ह्यातील ग्रामीण शैक्षणिक क्षेत्रात संस्थेने पुन्हा एकदा आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे.यावेळी संस्थेचे अध्यक्ष श्री. प्रितम जनार्दन म्हात्रे यांनी सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान करून त्यांचे विशेष कौतुक केले व पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. विद्यार्थ्यांनी ग्रामीण भागातील शैक्षणिक परंपरेचा गौरव वाढवत उत्कृष्ट यश संपादन केल्याबद्दल समाधान व्यक्त करण्यात आले. याप्रसंगी सौ. ममता प्रितम म्हात्रे, सभापती महिला व बालकल्याण समिती, पनवेल महानगरपालिका या उपस्थित होत्या.

---

# जिल्हा परिषद प्रशाला माध्यमिक शाळा सोयगांव येथील दहावीचा निकाल ७९.८३ % यशाची परंपरा कायम

**दैनिक युवक आधार**

**सोयगाव तालुका प्रतिनिधी विजय काळे :** सोयगाव जिल्हा परिषद प्रशाला सोयगांव ता सोयगांव येथील माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा फेब्रुवारी-मार्च २०२६ मध्ये झालेल्या माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (SSC) परीक्षेत घवघवीत यश संपादन करत उज्ज्वल परंपरा कायम राखली आहे.यंदा विद्यालयातून एकूण १२४ विद्यार्थी परीक्षेला प्रविष्ट झाले होते. त्यापैकी ९९ विद्यार्थी उत्तीर्ण होत शाळेचा एकूण निकाल ७९.८३ % इतका लागला आहे. यामध्ये १६ विद्यार्थी विशेष प्राविण्यासह, तर ४३ विद्यार्थी प्रथम श्रेणीत , ३७ विद्यार्थी व्दितीय श्रेणीत , ०३ विद्यार्थी पास श्रेणीत उत्तीर्ण झाले आहेत.गुणवंत विद्यार्थ्यांची यशोगाथा :

गुणानुक्रमे.प्रथम :-प्रीयंका रवींद्र जाधव ८८.२०,व्दितीय :- आरती कडुबा ढगे



८५.६०,तृतीय :- आकांक्षा राहूल बोराडे ८३.४०,चतुर्थ :- अक्षरा रमेश गायकवाड ८३.२०,पाचवी :- इश्वरी सुनील मोरे ८१.६०,सहावी :- वृषाली गोपाल गारखेडे ८०.६०,प्रशालेच्या या उल्लेखनीय यशाबद्दल सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे व त्यांच्या पालकांचे शाळेच्या वतीने मुख्याध्यापक दादाराव राठोड सर व गटशिक्षणाधिकारी सचिन शिंदे केंद्रप्रमुख श्री एफ एस तडवी यांनी मनःपूर्वक अभिनंदन केले.याशिवाय सुनील ठोंबरे अध्यक्ष व सर्व पदाधिकारी सदस्य शाळा व्यवस्थापन समिती,माजी विद्यार्थी संघाचे पदाधिकारी तुकाराम तायडे,माजी गटशिक्षणाधिकारी गिरीश जगताप,अरुण सोहनी,संजय शहापूरकर,राजेंद्र दुतोंडे,हर्षल काळे,संदीप चौधरी,निलेश गाडेकर,दिलीप रावने व माजी गा शि अ गिरीश जगताप सर मार्गदर्शक आणि सर्व शिक्षकवृंद सुकदेव पाटील शिवाजी नवले,दौलतसिंग परदेशी,भास्कर चौधरी,विद्याधर बागुल,राजेंद्र उंबरकर,संतोष भारद्वाज,संगीता सोनवणे,जय वाघ,तुकाराम पायाघन,वैजनाथ सावळे,सुनील शेटे ,सचिन ढगे,सीमा राऊत,शिवराम आगे यांच्या सह सर्व पालक व शिक्षणप्रेमी नागरिक यांनी अभिनंदन केले आहे.जिल्हा परिषद प्रशाला सोयगांव ता सोयगांव जि छत्रपती संभाजीनगरयांनी विद्यार्थ्यांचे कौतुक करत त्यांच्या पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी हार्दिक शुभेच्छा दिल्या.विद्यार्थ्यांच्या मेहनतीला आणि शिक्षकांच्या मार्गदर्शनाला लाभलेले हे यश भविष्यातही अशीच प्रेरणा देत राहो, हीच अपेक्षा सर्वांनी व्यक्त केली...!

---

# पालोद येथील पालोदकर विद्यालयाची यशाची परंपरा कायम

## दहावीचा ९३.६७ टक्के निकाल; प्रतीक्षा गव्हाणे विद्यालयात प्रथम

**दैनिक युवक आधार**

**योगेश पालोदकर जिल्हा प्रतिनिधी प्रमुख छत्रपती संभाजीनगर** -राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या वतीने मार्च २०२६ मध्ये घेण्यात आलेल्या इयत्ता दहावीच्या परीक्षेचा निकाल शुक्रवारी जाहीर झाला. यामध्ये पालोद (ता. सिल्लोड) येथील सहकार महर्षी माणिकराव पालोदकर विद्यालयाने घवघवीत यश संपादन केले असून विद्यालयाचा एकूण निकाल ९३.६७ टक्के लागला आहे.

विद्यालयातून यावर्षी एकूण १७४ विद्यार्थी परीक्षेसाठी प्रविष्ट झाले होते, त्यापैकी १६३ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. विद्यालयाच्या निकालात मुलींनीच वर्चस्व गाजवल्याचे दिसून आले. यामध्ये प्रतीक्षा राजाराम गव्हाणे ही ८८.८० टक्के गुण मिळवून विद्यालयात प्रथम आली. अक्षरा ज्ञानेश्वर लोखंडे व वैष्णवी राजेश हिवाळे यांनी प्रत्येकी ८८.६० टक्के गुणांसह द्वितीय क्रमांक पटकावला, तर धनश्री रामेश्वर लोखंडे हिने ८८.४० टक्के गुण मिळवून तृतीय क्रमांक पटकावला.

विद्यार्थ्यांच्या या घवघवीत यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष प्रभाकर पालोदकर, सचिव डॉ. राहुल पालोदकर, प्राचार्य डॉ. अशोक पंडित, माजी प्राचार्य ज्ञानेश्वर काकडे आणि प्राचार्य प्रदीप कानडजे यांनी यशस्वी विद्यार्थी, त्यांचे पालक आणि वर्षभर मेहनत घेणाऱ्या शिक्षकांचे अभिनंदन केले. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांवर परिसरातून कौतुकाचा वर्षाव होत असून, मान्यवरांनी त्यांच्या पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

---

# श्रीमती रतनबाई मानसिंग भुजबळ यांचे निधन

**दैनिक युवक आधार**

**सणसर :- विकास क्षत्रिय** : इंदापूर तालुक्यातील समाजकार्यशील व आदर्श व्यक्तिमत्त्व असलेल्या स्व. रतनबाई मानसिंग भुजबळ यांचे शुक्रवार दि. ०८ मे २०२६ रोजी अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले. त्यांच्या जाण्याने संपूर्ण परिसरात शोककळा पसरली आहे. रतनबाईंच्या आयुष्याचा प्रवास साधेपणात, परोपकारात आणि कुटुंबवत्सलतेत गेला. त्यांनी आपल्या आयुष्यातील प्रत्येक क्षण समाजहिता साठी वाहिला.त्यांच्या सहवासात आलेल्या प्रत्येकाला त्यांनी मायेचा स्पर्श दिला.

त्यांच्या निधनाने भुजबळ कुटुंबियांसह गावकरी, नातेवाईक, मित्रपरिवार आणि



समाजातील सर्व स्तरातील लोक भावनिक झाले आहेत. त्यांच्या आठवणींनी डोळ्यांत अश्रू तरळले असून, गावात हळहळ व्यक्त केली जात आहे.त्यांना तीन मुले व एक मुलगी,सुना नातवंडे असा परिवार आहे व सपकळवाडी गावचे मा.तंटामुक्ती अध्यक्ष रणजीत भुजबळ यांच्या त्या मातोश्री आहेत.

---

# प्रशासकीय योजना लोकांच्या दारापर्यंत पोहोचवा; आमदार अब्दुल सत्तार यांचे निर्देश

## सिल्लोड येथे 'महाराजस्व अभियान' टप्पा-१ चा समारोप; ६८३७ प्रकरणांचा निपटारा

**दैनिक युवक आधार**

**योगेश पालोदकर जिल्हा प्रतिनिधी प्रमुख छत्रपती संभाजीनगर** : “महसूल प्रशासन हे केवळ कागदपत्रांचे काम करणारे कार्यालय नसून जनतेच्या विश्वासाचे केंद्र आहे. प्रत्येक अधिकारी व कर्मचाऱ्यांनी संवेदनशीलता, पारदर्शकता आणि तत्परता या तीन तत्वांवर काम करावे. प्रलंबित प्रकरणे तातडीने मार्गी लावून सर्वसामान्यांना शासकीय योजनांचा लाभ मिळवून द्या,”असे स्पष्ट निर्देश आमदार अब्दुल सत्तार यांनी दिले.

येथील तहसील कार्यालयाच्या प्रांगणात आयोजित 'छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान टप्पा-१' चा समारोप आमदार अब्दुल सत्तार यांच्या प्रमुख उपस्थितीत उत्साहात संपन्न झाला. प्रारंभी छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेस अभिवादन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.

शिवकालीन महसूल पद्धतीचा आदर्श ठेवा

मार्गदर्शन करताना आमदार सत्तार यांनी शिवकालीन महसूल कार्यपद्धतीची उदाहरणे दिली. ते म्हणाले की, “शिवरायांच्या प्रशासनात रयतेच्या हिताला सर्वोच्च प्राधान्य होते. त्याच विचारातून प्रेरणा घेऊन सर्वसामान्यांच्या प्रश्नांचे निराकरण करण्याचा संकल्प सर्वांनी करावा. यंत्रणेने समन्वयातून काम करत पात्र लाभार्थ्यांना लाभ मिळवून द्यावा. विशेषतः घरकुल योजनेंतर्गत लाभार्थ्यांना शासनाच्या नियमाप्रमाणे तातडीने मोफत वाळू उपलब्ध करून द्यावी,” अशा सूचना त्यांनी उपविभागीय अधिकारी व तहसीलदार यांना दिल्या.

या अभियानांतर्गत विक्रमी ६,८३७ प्रलंबित




प्रकरणे मार्गी लावून लाभार्थ्यांना प्रत्यक्ष लाभ देण्यात आला. यावेळी प्रातिनिधिक स्वरूपात लाभार्थ्यांना प्रमाणपत्रांचे वाटप करण्यात आले. तसेच विविध क्षेत्रात प्राविण्य मिळवलेले विद्यार्थी, उत्कृष्ट कामगिरी करणारे शासकीय अधिकारी-कर्मचारी व माजी सैनिक अधिकारी-कर्मचाऱ्यांचा आमदार सत्तार यांच्या हस्ते गौरव करण्यात आला.

या प्रसंगी उपविभागीय अधिकारी लतीफ पठाण, परिविक्षाधीन उपजिल्हाधिकारी तथा तहसीलदार अंकिता ताकभाते, गटविकास अधिकारी दादाराव अहिरे, शिवसेना तालुकाप्रमुख केशवराव पा. तायडे, जि.प. सदस्य देविदास पालोदकर, उपनगराध्यक्ष विठ्ठल सपकाळ, नॅशनल सहकारी सूतगिरणीचे संचालक राजेंद्र ठोंबरे, शंकरराव खांडवे, संजय डमाळे, सुखदेव जाधव, नगरसेवक सिद्धेश्वर आहेर, शेख इम्रान, नायब तहसीलदार तुकाराम बनकर, मंडळ अधिकारी काशिनाथ ताठे आदींसह लाभार्थी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक तहसीलदार अंकिता ताकभाते यांनी केले. सूत्रसंचालन प्रशांत जोशी यांनी केले तर मंडळ अधिकारी काशिनाथ ताठे यांनी आभार मानले.


---

# ९८.४० टक्के गुणांसह प्रसाद आसोले यांची दैदिप्यमान कामगिरी; वाशिम जिल्ह्याचा मान उंचावला

## उद्योजक संतोष आसोले यांच्या सुपुत्राचे दहावीच्या परीक्षेत उज्ज्वल यश; भविष्यात सिव्हिल सर्व्हिसेसमध्ये जाऊन देशसेवेचे स्वप्न

**दैनिक युवक आधार**

**करण धोंगडे वाशीम जिल्हा प्रतिनिधी** : महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या दहावीच्या परीक्षेचा निकाल जाहीर होताच वाशिम जिल्ह्यातील अनेक विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन केले. यामध्ये मौजे सोनखास येथील रहिवासी आणि महाराष्ट्र उद्योजकता पुरस्कार २०२५ प्राप्त प्रसिद्ध उद्योजक श्री. संतोष त्र्यंबकराव आसोले यांचे सुपुत्र प्रसाद संतोष आसोले यांनी ९८.४० टक्के गुण मिळवत दहावीच्या परीक्षेत दैदिप्यमान यश संपादन केले



आहे. त्यांच्या या उल्लेखनीय यशामुळे संपूर्ण वाशिम जिल्ह्यातून त्यांच्यावर अभिनंदनाचा आणि शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

प्रसाद आसोले हा अत्यंत बुद्धिमान, अभ्यासू, जिद्दी आणि मेहनती विद्यार्थी म्हणून ओळखला जातो. लहानपणापासूनच त्याने शैक्षणिक क्षेत्रात सातत्याने उत्कृष्ट कामगिरी करत आपली गुणवत्ता सिद्ध केली आहे. दहावीच्या बोर्ड परीक्षेसारख्या महत्त्वाच्या टप्प्यावर त्याने नियोजनबद्ध अभ्यास, चिकाटी आणि आत्मविश्वासाच्या जोरावर हे उल्लेखनीय यश संपादन केले. ९८.४० टक्के गुण मिळवत त्याने केवळ आपल्या कुटुंबाचेच नव्हे, तर सोनखास गावासह संपूर्ण वाशिम जिल्ह्याचे नाव उज्ज्वल केले आहे.

प्रसादचे पाचवी ते दहावीपर्यंतचे शिक्षण वाशिम येथील माउंट कार्मेल इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये झाले. शालेय जीवनात तो नेहमीच गुणवंत विद्यार्थ्यांमध्ये गणला जात होता. अभ्यासाबरोबरच पर्यावरण संवर्धन, सामाजिक उपक्रम आणि विविध बौद्धिक स्पर्धांमध्येही त्याचा सक्रिय सहभाग राहिला आहे. शिस्त, प्रामाणिकपणा आणि ध्येयाप्रती असलेली निष्ठा ही त्याच्या व्यक्तिमत्त्वाची ठळक वैशिष्ट्ये आहेत.

आपल्या यशाबद्दल बोलताना प्रसाद आसोले म्हणाला, “या यशामागे माझे आई-वडील, कुटुंबीय, मित्रपरिवार आणि विशेषतः माझे शिक्षक यांचे मोलाचे मार्गदर्शन व सहकार्य आहे. त्यांनी दिलेल्या प्रेरणा, पाठबळ आणि विश्वासामुळेच मी हे यश मिळवू शकलो.” आपल्या यशाचे श्रेय त्याने नम्रपणे सर्व सहकाऱ्यांना दिले.

प्रसादच्या यशाबद्दल बोलताना त्याचे आई-वडील म्हणाले की, प्रसाद हा लहानपणापासूनच अभ्यासू, जिद्दी आणि मेहनती आहे. कोणतेही ध्येय ठरवले की ते पूर्ण करण्यासाठी तो सातत्याने प्रयत्नशील राहतो. सामाजिक जाणीव आणि देशसेवेची तीव्र इच्छा त्याच्या मनात असून भविष्यात सिव्हिल सर्व्हिसेसमध्ये प्रवेश करून देशासाठी कार्य करण्याचे त्याचे स्वप्न आहे. त्याच्या या ध्येयासाठी आम्ही सदैव त्याच्या पाठीशी राहू, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

प्रसादच्या या यशाबद्दल शाळेचे शिक्षक, मित्र, नातेवाईक, सामाजिक कार्यकर्ते, उद्योजक तसेच विविध क्षेत्रातील मान्यवरांनी त्याचे अभिनंदन केले आहे. विशेष म्हणजे प्रसिद्ध उद्योजक संतोष आसोले यांच्या कुटुंबातील ही शैक्षणिक परंपरा आणि गुणवत्तेची परंपरा पुढे नेणारे प्रसादचे हे यश अनेक विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरत आहे.आजच्या स्पर्धात्मक युगात कठोर परिश्रम, योग्य मार्गदर्शन आणि ध्येय निश्चिती यांच्या जोरावर कोणतेही यश प्राप्त करता येते, याचे उत्कृष्ट उदाहरण प्रसाद आसोले यांनी घालून दिले आहे. त्यांच्या या दैदिप्यमान यशामुळे वाशिम जिल्ह्याच्या शैक्षणिक क्षेत्रात आणखी एक सुवर्ण पान जोडले गेले आहे.

## मित्रानेच इतरांच्या मदतीने मित्राला लुटले, 57 तोळ्यांचे दागिने चोरले, सात जणांना पोलिसांनी केली अटक

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल वार्ताहर** : चाकूने वार करून 57 तोळ्यांचे दागिने चोरून नेणाऱ्या गुन्हेगारांना अटक करून खारघर पोलिसांनी मुद्देमाल हस्तगत केला. त्यातील पाच आरोपींची रवानगी न्यायालयीन कोठडीत करण्यात आली असून दोन आरोपी पोलीस कोठडी मध्ये आहेत. महत्त्वाचे म्हणजे यातील आरोपी फिर्यादी यांचा मित्र आहे.

यातील फिर्यादी सुशांत मोरे (वय 37 राहणार खारघर) हे मित्रांसोबत 22 एप्रिल रोजी जेवण करून कार पार्क करून पायी चालत घरी जात होते. यावेळी त्यांच्या पाठीमागून तीन अनोळखी ईसम आले आणि त्यांनी मोरे आणि त्यांच्या मित्रांसोबत झटापट करून मारहाण केली आणि मोरे यांच्या हातावर चाकूने वार करून जखमी केले आणि 57 तोळे सोन्याचे दागिने असलेली पिशवी जबरीने खेचून ते पळून गेले. या प्रकरणी खारघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाल्यानंतर पोलिसांनी चार तपास पथके तयार केली. यावेळी फिर्यादीचा मित्र अभिनंदन माळी याने त्याची पत्नी व मेव्हणा तसेच त्याचे गावाकडील साथीदार यांना फिर्यादीची माहिती



देऊन गुन्ह्याचा कट रचला आणि गुन्हा घडवून आणल्याचे निष्पन्न झाले. पोलिसांनी अभिनंदन तानाजी माळी, कोमल अभिनंदन माळी, वैभव भानुदास माळी यांना 27 एप्रिल रोजी अटक केली तर शुभम धनाजी पाटोळे आणि संदीप कृष्णदेव गुंजळे यांना 28 एप्रिल रोजी अटक केली. गुन्ह्यातील मुख्य आरोपी हर्षद रमेश सागरे, राहुल उर्फ अमित राजेंद्र माळी हे तेलंगणा, सांगली, सातारा, सोलापूर, पंढरपूर या भागातील बाळूमामाच्या देवस्थानच्या पालख्यांमध्ये फिरत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यानुसार पोलिसांनी तावशी, पंढरपूर येथून दोघांना अटक केली. हे दोघेही पोलीस कोठडीत आहेत. आरोपींकडून 57 तोळे वजनाचे सोन्याचे दागिने, गुन्ह्यात वापरलेली शस्त्र, कार, मोटरसायकल हस्तगत करण्यात आली.

# सिल्लोडमध्ये वीर शिरोमणी महाराणा प्रताप सिंह यांना अभिवादन

### आमदार अब्दुल सत्तार यांच्या प्रमुख उपस्थितीत जयंती सोहळा उत्साहात ; ठिकठिकाणी प्रतिमा पूजन

**दैनिक युवक आधार**

**योगेश पालोदकर जिल्हा प्रतिनिधी प्रमुख छत्रपती संभाजीनगर** : महापराक्रमी, वीर शिरोमणी महाराणा प्रताप सिंह यांची जयंती शनिवारी (दि. ९) सिल्लोड शहरात अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली. या निमित्ताने शहरातील महाराणा प्रताप सिंह चौक आणि शिवसेना भवन येथे आयोजित कार्यक्रमांत आमदार अब्दुल सत्तार यांनी प्रमुख उपस्थिती दर्शवून अभिवादन केले.शहरातील महाराणा प्रताप सिंह चौक येथे जयंतीनिमित्त विशेष अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी आमदार अब्दुल सत्तार यांच्या हस्ते महाराणा प्रताप सिंह यांच्या नामफलकास



पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले. यावेळी उपस्थित नागरिकांशी संवाद साधताना आमदार सत्तार यांनी सर्वांना जयंतीच्या शुभेच्छा दिल्या. "स्वाभिमान, पराक्रम आणि मातृभूमीप्रती निष्ठा यांचे प्रतीक असलेले महाराणा प्रताप सिंह यांचे कार्य व विचार सदैव प्रेरणादायी आहेत," असे प्रतिपादन त्यांनी यावेळी केले.

आमदार अब्दुल सत्तार यांचे जनसंपर्क कार्यालय शिवसेना भवन येथे तालुका शिवसेनेच्या वतीने देखील महापराक्रमी, वीर शिरोमणी महाराणा प्रताप सिंह यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. याप्रसंगी आमदार अब्दुल सत्तार यांच्या हस्ते महाराणा प्रताप सिंह यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.या प्रसंगी नगराध्यक्ष अब्दुल समीर, शिवसेना तालुकाप्रमुख केशवराव तायडे, अशोक सूर्यवंशी, उपनगराध्यक्ष विठ्ठल सपकाळ, नगरसेवक सुधाकर गायकवाड, शेख इम्रान (गुड्डू), शेख बाबू, सिद्धेश्वर आहेर, सुनील दुधे, अशोक बन्सोड, जितू आरके, शिवसेना उपजिल्हाप्रमुख किशोर अग्रवाल, जिल्हा संघटक सुदर्शन अग्रवाल, शिवसेना महिला आघाडीच्या दुर्गाबाई पवार, शकुंतलाबाई बन्सोड, मेघा शाह, नॅशनल सहकारी सूतगिरणीचे संचालक शंकरराव खांडवे, राजेंद्र ठोंबरे, सयाजीराव वाघ, शेख सलीम हुसेन, कृउबा समितीचे संचालक शेख जावेद, युवासेनेचे अक्षय मगर, राहुल महाजन, फहिम पठाण, राजेंद्र साठे तसेच मानसिंग राजपूत, डॉ. विकास गोठवाल, डॉ. मध्यमसिंग मेहेर, अमरसिंग राजपूत, विठ्ठलसिंग ठाकूर, शैलेश गौर, विक्रांत गौर, संदीप झलवार, प्रभुलाल झलवार, देवसिंग करघे, रामदास पवार आदींची उपस्थिती होती.

## राज्य लॅक्रोस स्पर्धेसाठी नाशिकचा संघ घोषित, राज्य स्पर्धेसाठी परभणी येथे रवाना

**दैनिक युवक आधार**

**निफाड क्रीडा प्रतिनिधी विलास गायकवाड** : शेलु, परभणी येथे ४ थ्या महाराष्ट्र राज्य लॅक्रोस अजिंक्यपद स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेमध्ये सहभाग घेणाऱ्या नाशिक जिल्ह्याच्या संघांची काल अंतिम निवड करण्यात आली आहे. दिनांक २८ एप्रिल रोजी जिल्हा संघांची निवड करण्यासाठी निवड चाचणीचे आयोजन करण्यात आले होते. या निवड चाचणीत सहभागी झालेल्या खेळाडूंमधून १८ पुरुष आणि १८ महिलांची प्राथमिक निवड करण्यात आली होती. या निवड झालेल्या खेळाडूंचे दिनांक २९ एप्रिल ते ५ मे पर्यंत सराव शिबिर आयोजित करण्यात आले होते. या शिबिरामधून अंतिम १२ पुरुष आणि १२ महिलांची निवड




करण्यात आली आहे. हे निवड झालेले खेळाडू राज्य स्पर्धामध्ये नाशिक जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करतील.हे नाशिक जिल्ह्याचे संघ आज राज्य स्पर्धेसाठी नाशिक येथून रवाना झाले. या संघांना नाशिक मनपाचे नगरसेवक हेमंत शेट्टी, सौ. सरिता सोनवणे, सौ. मोनिका हिरे, सागर लामखडे, आई फाउंडेशनचे शंकर हिरे यांनी शुभेच्छा दिल्या. याचबरोबर संघाला लॅक्रोस असोसिएशन ऑफ नाशिकचे अध्यक्ष मुकुंद झनकर, शिवछत्रपती पुरस्कार प्राप्त आनंद खरे, जिल्हा संघटनेचे सरचिटणीस दीपक निकम-पाटील, खजिनदार सौ. ज्योती निकम आदींनी शुभेच्छा दिल्या. खेळाडू चांगली कामगिरी करतील असा विश्वास त्यांच्या प्रशिक्षकांनी यावेळी व्यक्त केला.

**निवड झालेल्या खेळाडूंखालील प्रमाणे**

महिला: -श्रद्धा कापसे. वर्षा कोळी, अनुष्का घोलप, शर्मिन शेख, पायल नाईकवाडे, मयुरी जगताप, तेजश्री थेटे, रोशनी नंदन, आनंदी लहाने, माही चक्रवर्ती, मृण्मयी झनकर, निकिता जगताप.

संघ मार्गदर्शक: दीपक निकम, संघ व्यवस्थापक: हिना शेख

पुरुष - आर्यन दराडे, मनीष प्रजापती, योगेश गवळी, हेमंत गवळी, क्षितिज शिंदे, अभयकुमार प्रसाद, लक्ष्मण राठोड, अमित कदम, संदेश राठोड, शैलेंद्रपाल सिंग, प्रदीप डोंगरे, शुभम पैठणे संघ व्यवस्थापक: शशीभूषण सिंग, संघ मार्गदर्शक: अविनाश वाघ

## दादरपाड्याची 'साची कासुकर' उरण तालुक्यात प्रथम; कराडी समाजाच्या कन्येने ग्रामीण गुणवत्तेचा झेंडा रोवला!

**दैनिक युवक आधार**

**तृप्ती भोईर उरण /प्रतिनिधी** : नुकत्याच जाहीर झालेल्या दहावीच्या निकालात उरण तालुक्याचा निकाल ९४.५९% लागला असून, खऱ्या अर्थाने कौतुकाचा विषय ठरली आहे ती दादरपाडा सारख्या एका छोट्याशा ग्रामीण भागातील साची संतोष कासुकर. सेंट मेरी जे.एन.पी.ए. माध्यमिक शाळेची विद्यार्थिनी असलेल्या साचीने तब्बल ९९.६०% गुण मिळवून संपूर्ण उरण तालुक्यात प्रथम येण्याचा ऐतिहासिक बहुमान पटकावला आहे.साची ही कराडी समाजाची कन्या असून, तिने दादरपाड्यासारख्या एका साध्या खेडेगावातून शिक्षण घेत हे यश मिळवले आहे. उरणचे गटशिक्षणाधिकारी सागर पवार यांनी निकालाचा अधिकृत अहवाल जाहीर करत साचीच्या या विशेष यशाचे मनापासून कौतुक केले. साचीने मिळवलेले हे यश केवळ तिचे नसून संपूर्ण कराडी समाजाचा आणि ग्रामीण भागाचा सन्मान आहे.

उरण तालुक्यातील पहिले सहा गुणवंत विद्यार्थी:




यंदाच्या निकालात साचीसह तालुक्यातील इतर पाच विद्यार्थ्यांनीही आपल्या चमकदार कामगिरीने उरणच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे. तालुक्यातील पहिले सहा गुणवंत विद्यार्थी खालीलप्रमाणे आहेत:

१. साची संतोष कासुकर – ९९.६०% (तालुक्यात प्रथम)
२. तनिष्का नितीन ठाकूर – ९८.२०%
३. मोक्ष विजय म्हात्रे – ९७.६०%
४. सृष्टी दत्ता सुळे – ९७.४०%
५. आर्या आतिश पाटील – ९६.४०%
६. मैत्रयी प्रवीण घरत – ९६.४०%

साचीचे हे यश केवळ आकड्यांचे गणित नसून, ते एका ग्रामीण मुलीच्या स्वप्नांची आणि तिच्या पालकांच्या कष्टाची गोड फळश्रुती आहे. जेव्हा निकाल जाहीर झाला आणि साची तालुक्यात प्रथम आल्याने आपल्या लेकिनी संपूर्ण तालुक्यात नाव काढल्याने तिच्या आई-वडिलांचा वर अभिमानाने भरून आला असेल दादर पाडा गावासह संपूर्ण उरण तालुक्यात आनंदाचे वातावरण आहे सर्व यशस्वी विद्यार्थ्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात येत आहेत.

## वहाली गावच्या सरपंचाच्या लेकीचा राज्यात डंका दहावी बोर्ड परीक्षेत शंभर पैकी शंभर गुण घेत अक्षरा पवारने पाटोदा तालुक्याची मान उंचावली

**दैनिक युवक आधार**

**पाटोदा (प्रतिनिधी) :** पाटोदा तालुक्यातील वहाली गावासाठी अभिमानाची आणि आनंदाची बातमी समोर आली असून गावचे सरपंच अशोक पवार यांची कन्या तसेच युवा नेते शरद पवार यांची पुतणी कु.अक्षरा पवार हिने दहावी बोर्डाच्या परीक्षेत शंभर पैकी शंभर गुण मिळवत ऐतिहासिक यश संपादन केले आहे. तिच्या या उल्लेखनीय कामगिरीमुळे संपूर्ण पाटोदा तालुक्यातून तिच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. अत्यंत शांत, अभ्यासू आणि मेहनती स्वभावाची असलेल्या अक्षरा पवार हिने वर्षभर सातत्याने अभ्यास करत हे यश मिळवले. ग्रामीण



भागातून शिक्षण घेत असतानाही तिने आपल्या जिद्द, आत्मविश्वास आणि कठोर परिश्रमाच्या बळावर राज्यभरात आपल्या गुणवत्तेचा ठसा उमटवला आहे. दहावीच्या अत्यंत महत्त्वाच्या परीक्षेत शंभर टक्के गुण मिळवणे ही मोठी आणि दुर्मिळ कामगिरी मानली जात असून अक्षराने हे यश संपादन करून वहाली गावाचे नाव राज्यभर पोहोचवले आहे.

**"अक्षराने घेतलेली मेहनत आणि तिचा अभ्यासातील सातत्यपूर्ण प्रयत्न यामुळेच हे यश मिळाले. मुलीने शंभर टक्के गुण मिळवून आमच्या कुटुंबासह संपूर्ण गावाचा सन्मान वाढवला आहे. तिचा आम्हाला अभिमान आहे."**

**अशोक पवार (सरपंच)**
**कु.अक्षराचे वडील**

**"ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी अक्षराचे यश प्रेरणादायी आहे. मेहनत, जिद्द आणि योग्य नियोजन असेल तर मोठे यश मिळवता येते, हे तिने सिद्ध करून दाखवले आहे. तिच्या पुढील शैक्षणिक वाटचालीस मन:पूर्वक शुभेच्छा."कु.अक्षरा पवार हिच्या या नेत्रदीपक यशामुळे वहाली गावात आनंदोत्सव साजरा करण्यात येत असून पाटोदा तालुक्यासाठी ही अभिमानाची बाब ठरत आहे.**

**शरद पवार (युवा नेते)**
**कु.अक्षराचे काका**

अक्षराच्या यशामागे तिचे आई-वडील, शिक्षकांचे मार्गदर्शन आणि कुटुंबाचा पाठिंबा महत्त्वाचा ठरल्याचे बोलले जात आहे. तिच्या या यशामुळे गावात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून नातेवाईक, मित्र परिवार तसेच सामाजिक, राजकीय आणि शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवर तिचे अभिनंदन करत आहेत.

## इंदिरा गांधी माध्यमिक विद्यालय मेंडका चा एस.एस.सी. निकाल ८८.०५ टक्के

### विद्यार्थ्यांच्या यशाने परिसरात आनंदाचे वातावरण

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी : प्रकाश गवारे** : मेंडका येथील इंदिरा गांधी माध्यमिक विद्यालय मेंडका ने सन २०२५-२६ च्या एस.एस.सी. परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करत ८८.०५ टक्के निकालाची उज्ज्वल परंपरा कायम राखली आहे. विद्यालयाच्या या यशामुळे विद्यार्थ्यांसह पालक, शिक्षक व ग्रामस्थांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.यावर्षी विद्यालयातून एकूण ६८ विद्यार्थी परीक्षेस बसले होते. त्यापैकी ६७ विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष परीक्षा दिली. परीक्षेच्या निकालात ७५ टक्क्यांपेक्षा अधिक गुण मिळवून ६ विद्यार्थ्यांनी विशेष प्राविण्य संपादन केले असून विद्यालयाचे नाव जिल्हास्तरावर उज्ज्वल केले



आहे. तसेच प्रथम श्रेणीत १९ विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून द्वितीय श्रेणीत २१ विद्यार्थ्यांनी यश मिळवले आहे. याशिवाय १३ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. एकूण ९ विद्यार्थी अनुत्तीर्ण राहिले असले तरी विद्यालयाचा एकत्रित निकाल ८८.०५ टक्के लागल्याने शाळेच्या शैक्षणिक गुणवत्तेची पुन्हा एकदा प्रचिती आली आहे.विद्यालयाच्या यशामागे मुख्याध्यापक, शिक्षकवृंद, पालक व विद्यार्थ्यांची मेहनत असल्याची भावना व्यक्त करण्यात आली.

# पोस्ट विभाग हा भारतीय सांस्कृतिक व्यवस्थेचा महत्त्वाचा भाग – मुख्यमंत्री

### 'जन सेवा कनेक्ट' उपक्रमांतर्गत अत्याधुनिक सुविधांनी सुसज्ज पोस्ट ऑफिस जनतेच्या सेवेत दाखल

**मुंबई :** गरीब-श्रीमंत, जात-धर्म न पाहता पोस्ट विभागाची सेवा देशाच्या कानाकोपऱ्यापर्यंत पोहोचलेली आहे. कारगिल युद्धाच्या काळातही वीर जवानांचे संदेश त्यांच्या कुटुंबीयांपर्यंत पोहोचविणारे पोस्टमन हे मानवी संवेदनांचे वाहक ठरले. पोस्ट विभाग हा केवळ सेवा देणारा विभाग नसून भारतीय सांस्कृतिक व्यवस्थेचा महत्त्वाचा भाग असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, दळणवळण तसेच ईशान्य क्षेत्र विकास मंत्री ज्योतिरादित्य शिंदे यांच्या हस्ते मुंबईतील अंधेरी रेल्वे स्थानक परिसरातील नूतनीकरण करण्यात आलेल्या अत्याधुनिक पोस्ट ऑफिसचे लोकार्पण करण्यात आले.

यावेळी आमदार अमित साटम, आमदार हारून खान, महाराष्ट्र-गोवा सर्कलचे मुख्य पोस्टमास्तर जनरल अमिताभ सिंह तसेच पोस्टमास्तर जनरल के. अरोरा आदी उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या 'वारसा आणि विकास' या विचारातून पोस्ट विभागाने आधार सेवा, बँकिंग सेवा, ऑटोमॅटिक पार्सल सेवा




यांसारख्या आधुनिक सेवांचा स्वीकार केला आहे. इंटरनेट, एसएमएस आणि ई-मेलसारख्या आधुनिक संदेशवहन साधनांमुळे पोस्ट विभागासमोर आव्हाने निर्माण झाली. खासगी कुरिअर सेवांमुळे स्पर्धाही वाढली. मात्र प्रधानमंत्री मोदी यांच्या दूरदृष्टीतून पोस्ट विभागाच्या सामर्थ्याला नवी दिशा मिळाली. पोस्ट बँकसारख्या सेवांमुळे विभागाने मोठे परिवर्तन साधले असून या परिवर्तनात केंद्रीय मंत्री शिंदे यांचेही महत्त्वपूर्ण योगदान आहे.

पोस्ट विभागाने महसुलातील वाढीचा दर अडीच टक्क्यांवरून यंदा १६ टक्क्यांपर्यंत नेला असून नव्या स्वरूपात जनतेच्या सेवेत दाखल होताना अनेक नवे विक्रम प्रस्थापित केले आहेत. पोस्टमन आणि पोस्ट विभागाचे समाजजीवनातील महत्त्व मराठीतील पु. ल. देशपांडे तसेच हिंदी लेखक शरद जोशी यांच्या साहित्यामधूनही अधोरेखित झाले असल्याचे मुख्यमंत्री म्हणाले. सामान्य माणसासाठी पोस्ट विभागाने मोठी कामगिरी बजावली असल्याचेही त्यांनी नमूद केले.

राज्यात 'जनसेवा कनेक्ट'च्या माध्यमातून २२०० पोस्ट ऑफिस सुरू करण्यात येत असून त्यासाठी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि केंद्रीय मंत्री ज्योतिरादित्य शिंदे यांचे त्यांनी आभार मानले.

पोस्ट विभागाने सर्वसामान्यांच्या सेवेला अग्रक्रम दिला–केंद्रीय मंत्री ज्योतिरादित्य शिंदे

केंद्रीय मंत्री ज्योतिरादित्य शिंदे म्हणाले की, गाव असो वा शहर, प्रत्येक कुटुंबाच्या मनामध्ये पोस्टमनबद्दल विशेष आत्मीयता आहे. देशातील दीड लाख पोस्ट कार्यालयांमार्फत सेवा देताना पोस्ट विभागाने सर्वसामान्यांच्या सेवेला अग्रक्रम दिला आहे. पोस्ट लाईफ इन्शुरन्समध्ये दीड कोटी खाती आणि जवळपास दोन लाख कोटी रुपयांच्या ठेवी जमा झाल्या असून पोस्ट बँकेत ४० कोटी खाती उघडण्यात आली आहेत. या माध्यमातून पोस्ट विभागाने जनतेचा मोठा विश्वास संपादन केला आहे.